www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-207 • Sunday, 31 December 2023 •Pages-04 •Rs.2/-

अनमोल विचार

मेहनत नावाचा मित्र सोबत असला की अपयश नावाच्या शत्रूची भीती वाटत नाही.

लक्षवेधी

PMO कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या विनेश फोगाटला अडवले

नवी दिल्ली : कुस्तीपटू साक्षी मलिकची निवृत्ती आणि बजरंग पुनियाने पद्मश्री पुरस्कार परत करण्याची घोषणा केल्यानंतर आता महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हीने मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार आणि अर्जुन पुरस्कार परत केला आहे. पंतप्रधान कार्यालयाच्या दिशेने पुरस्कार घेऊन जात असताना विनेश फोगाटला पोलिसांनी रोखले. त्यानंतर विनेश फोगाटने कर्तव्य मार्गावरील बॅरिकेड्सवर आपला पुरस्कार ठेऊन माघारी परतली. पुरस्कार परत करण्यापूर्वी विनेश फोगट म्हणाली की, हा दिवस कोणत्याही खेळाडूच्या आयुष्यात येऊ नये. देशातील महिला कुस्तीपटू अत्यंत वाईट अवस्थेतून जात आहेत. मला देण्यात आलेला मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार आणि अर्जुन पुरस्कार परत करत आहे, असं मतही व्यक्त केलं. विनेश फोगाट पुरस्कार परत करताना भावूक झाल्याचे देखील दिसून आले.

मिझोराममध्ये घुसले म्यानमारचे 151 सैनिक, आसाम रायफल्सने घेतला 'हा' निर्णय

नवी दिल्ली : म्यानमारमध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धादरम्यान मिझोराम सीमेवरून मोठी बातमी येत आहे. म्यानमारच्या १५१ सैनिकांनी आसाम रायफल्ससमोर आत्मसमर्पण केले आहे. हे सैनिक सीमा ओलांडून मिझोरामच्या लांगतलाई जिल्ह्यातील तुइसेंटलांग गावात घुसले होते. हे म्यानमार आणि भारताच्या सीमेवरील गाव आहे. आता त्यांच्या परतीची कारवाई सुरू आहे. काही आवश्यक कारवाई केल्यानंतर त्यांना मणिपूरमधील मोरेह येथे आणि तेथून म्यानमारला नेण्यात येईल. म्यानमारचे लष्कर आणि बंडखोर सैन्य यांच्यात सध्या संघर्ष सुरू आहे. त्यामुळे म्यानमारचे सैनिक सातत्याने भारतात आत्मसमर्पण करत आहेत.

मौर्य यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्याची श्री नीलकंठ सेवा संस्थानची मागणी !

रायपूर - हिंदु धर्माविषयी संतापजनक विधाने केल्याच्या प्रकरणी समाजवादी पक्षाचे नेते स्वामी प्रसाद मौर्य यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात यावा, अशी मागणी श्री नीलकंठ सेवा संस्थानने केली आहे. श्री नीलकंठ सेवा संस्थानच्या पदाधिकार्यांनी रायपूर उत्तर विधानसभेचे आमदार श्री. पुरंदर मिश्रा यांना या मागणीविषयी एक निवेदन सादर केले आहे. श्री नीलकंठ सेवा संस्थानचे संस्थापक श्री नीलकंठ त्रिपाठी यांनी सांगितले की, गेल्या अनेक दिवसांपासून समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस स्वामी प्रसाद मौर्य हे हिंदु धर्माविषयी आक्षेपार्ह विधाने करत आहेत. अलीकडेच त्यांनी 'हिंदु धर्म एक धोका आहे', असे संतापजनक विधान केले होते; मात्र त्यांच्यावर अद्याप कोणतीही कायदेशीर कारवाई झालेली नाही.

जय श्री रामच्या जयघोषाने दिल्ली-अयोध्या पहिल्या विमानाला सुरुवात

नवी दिल्ली : श्रद्धेची नगरी असलेल्या अयोध्येत इतिहास रचला गेला आहे. शनिवारी, 30 डिसेंबर 2023 रोजी पंतप्रधान मोदींनी महर्षि वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन केले. त्यानंतर अयोध्या धामसाठी इंडिगोचे पहिले विमान दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केले. या उड्डाणाची कमान अनुभवी पायलट कॅप्टन आशुतोष शेखर यांनी घेतली होती. विमानाने उड्डाण करण्यापूर्वी कॅप्टन शेखर यांनी प्रवाशांचे मनापासून स्वागत केले आणि या ऐतिहासिक क्षणाचा एक भाग असल्याबद्दल त्यांचे आभार मानले. या विशेष विमानाचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे ही त्यांच्यासाठीही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. विमानातील प्रवाशांमध्ये मोठा उत्साह होता.

ममता दीदींना आघाडी नकोय, काँग्रेसचे अधीर रंजन चौधरी भलतेच संपातले

नवी दिल्ली : अलीकडेच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेस बंगालमध्ये निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले होते. इंडिया आघाडीची आघाडी राष्ट्रीय स्तरावर आहे पण भाजपला पराभूत करण्याची ताकद एकट्या टीएमसीमध्ये आहे. त्यावर आता शनिवारी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी यांनी ममता बॅनर्जींवर हल्लाबोल करत म्हटले आहे की, दीदींनाच विरोधकांची एकी नको आहे. डाव्या विचारसरणीच्या पक्षांची एकत्रित मोट बांधणे जास्त सोपे असल्याचेही ते म्हणाले.

एक, दोन नाही तब्बल सात वेळा समन्स! हेमंत सोरेन ईडीसमोर झाले नाही हजर

नवी दिल्ली : एकीकडे दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना ईडीने नोटीस बजावत चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले. मात्र, अरविंद केजरीवाल विपश्यना शिबिरासाठी गेले. ईडीने दोन वेळा समन्स बजावले होते. तर, दुसरीकडे एका प्रकरणात ईडीने सहावेळा समन्स बजावूनही झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन ईडीसमोर हजर झाले नसल्याचे सांगितले जात आहे. ईडीने सातव्यांदा समन्स बजावत चौकशीसाठी हजर होण्याचे निर्देश दिले आहेत. अंमलबजावणी संचालनालयाने जमीन घोटाळ्याप्रकरणी हेमंत सोरेन यांना पीएमएलए अंतर्गत सातवे समन्स जारी केले आहे.

भारताकडून कुख्यात गँगस्टर लखबीर सिंह लांडा दहशतवादी घोषित

नवी दिल्ली : कॅनडामध्ये वास्तव्यास असणाऱ्या लखबीर सिंह लांडा याला केंद्र सरकारने दहशतवादी म्हणून घोषित केलं आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने दहशतवाद विरोधी कायद्यानुसार ही कारवाई करत लखबीर सिंह लांडा याचा समावेश दहशतवाद्यांच्या यादीत केला आहे. मोहाली येथील पंजाब स्टेट इंटेलिजेन्स हेडक्वार्टरवर झालेल्या हल्ल्यात लखबीर सिंह लांडा याचा सहभाग होता. तसंच अनेक ठिकाणी वसुली, हत्या, बॉम्बस्फोट, हत्यारांसह अमली पदार्थांच्या तस्करीत तो सक्रिय आहे, अशी माहिती गृहमंत्रालयाकडून देण्यात आली आहे.

ठाणे रेल्वे स्थानकात ढोल-ताशांच्या गजरात वंदे भारत एक्स्प्रेसचे स्वागत !

भाजप आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांकडून पक्षाचे झेंडे उंचावत जोरदार शक्तीप्रदर्शन

■ठाणे। यश सावंत,

जालना-सीएसएमटी वंदे भारत एक्स्प्रेस शनिवारी सायंकाळी ठाणे रेल्वे स्थानकात दाखल होताच, शिवसेना ठाकरे गट आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी ढोल आणि ताशांच्या गजरात वंदे भारत एक्स्प्रेसचे स्वागत केले. तसेच पक्षाचे झेंडे उंचावत घोषणाबाजी केली.

ठाणे रेल्वे स्थानकात जालना-सीएसएमटी वंदे भारत एक्स्प्रेसला थांबा देण्यात आला आहे. या एक्स्प्रेसमुळे ठाणे शहरात राहणाऱ्या जालनावासियांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही रेल्वेगाडी सायंकाळी ६.१५ वाजताच्या सुमारास ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक सहावर दाखल होणार होती. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांच्यासह काही शिवसैनिक सायंकाळी पाचवाजेपासून ठाणे स्थानकात दाखल झाले होते. त्यानंतर, भाजपचे महिला आणि पुरूष कार्यकर्ते फलाट क्रमांक सहावर दाखल झाले. एक्स्प्रेस ठाणे रेल्वे स्थानकात येण्यापूर्वी खासदार राजन विचारे हे त्यांच्या कार्यकर्त्यांसह फलाट क्रमांक सहावर आले. त्यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने घोषणाबाजी करण्यास सुरूवात केली. त्यानंतर ठाकरे गटानेही शिवसेना जिंदाबाद, उद्धव ठाकरे यांच्या नावाने घोषणबाजी सुरू केली. दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यामध्ये शक्ती प्रदर्शन सुरू असल्याचे चित्र होते.

वंदे भारत एक्स्प्रेस स्थानकात दाखल झाल्यानंतर खासदार राजन विचारे यांनी मोटारमनच्या केबिनमध्ये शिरून रेल्वे अधिकाऱ्यांचे स्वागत केले. त्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनीही मोटरमनच्या केबिनमध्ये प्रवेश करण्यास सुरूवात केली. मोटरमन केबिनमध्ये गर्दी होऊ लागल्याने अखेर पोलिसांनी मोटरमनच्या केबिनचा दरबाजा बंद केला. काही वेळानंतर दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते निघून गेली आणि स्थानकातील गोंगाट कमी झाला.

'मला निमंत्रणाची गरज नाही.. हवे तेंव्हा अयोध्येला जाऊ शकतो', उद्धव ठाकरेंनी स्पष्टचं सांगितलं

■मुंबई, विशाल कारंडे

अयोध्येत राम मंदिर होते आहे ही आनंदाची बातमी आहे. मला २२ जानेवारीच्या सोहळ्याचे निमंत्रण मिळालेले नाही आणि मला त्याची गरजही नाही. २२ जानेवारी या दिवशीच तेथे गेले पाहिजे असे काही नाही. मी मला जेंव्हा वाटेल तेंव्हा तेथे दर्शनाला जाऊ शकतो. मंदिराच्या बांधकामाच्या अगोदरही मी तेथे दर्शनासाठी गेलो होतो असे शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नेते उध्दव ठाकरे यांनी म्हटले आहे.

राम मंदिर आंदोलनाच्या वेळी शिवसैनिकांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करत ते म्हणाले, हिंदुत्व आणि राम मंदिराचा प्रचार केल्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार काढून घेण्यात आला होता. असंख्य शिवसैनिकांनी आणि कारसेवकांनी राम मंदिरासाठी त्याग केला आहे. ज्यावेळी शिवसेना-भारतीय जनता पाटीर्चे सरकार होते तेंव्हा सरकार कायदा करून राम मंदिर बनवेल असे मला वाटले होते. मात्र तसे झाले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर हे मंदिर होते आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाच्या संदर्भात बोलताना उध्दव म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी बोलणी जवळपास पूर्ण झाली आहे. मात्र दोन्ही पक्षांत कोणकोणत्या जागांबाबत चर्चा अथवा सहमती झाली आहे याचा तपशील त्यांनी दिला नाही. काँग्रेससोबतच्या जागावाटपासंदर्भात बोलताना ते म्हणाले की आमचे सगळे बरोबर चालले आहे. १९ डिसेंबर रोजी दिल्लीत इंडिया आघाडीची जी बैठक झाली त्यात माझी राहुल गांधी, सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्याशी चर्चा झाली आहे. चर्चेत संजय राऊतही माज्यासोबत होते. काँग्रेस नेत्यांना आम्ही आमचे म्हणणे सांगितले आहे. काँग्रेसचे महाराष्ट्रातील किंवा दिल्लीतील कोणी मोठे नेते त्यांच्याकडून मला काही सांगत नाहीत तोपर्यंत मीही यावर काही बोलणार नाही. तसेच वंचित बहुजन आघाडीबाबत माज्याकडे कोणता फॉम्यूर्ला नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रकाश आंबेडकर यांनी जागावाटपाच्या संदर्भात जो फॉम्युर्ला दिला आहे तो त्यांचा स्वतःचा फॉम्युर्ला आहे. जागावाटपाबाबत आमची त्यांच्याशी बोलणी सुरू आहे.

वेब सीरिजने भारतीय संस्कृती बिघडवली, कठोर कायदा करा; धर्मगुरु देवकीनंदन ठाकूर यांची मागणी

■मुंबई । नितीन देवळेकर,

मुंबईतील बोरिवली येथे धर्मगुरु देवकीनंदन ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेतली. देवकीनंदन ठाकूर म्हणाले. तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे प्रभू श्रीरामांना इतके दिवस दूर राहावे लागले.मात्र 22 जानेवारीला अखेर राम मंदिरातचे स्वप्न साकार होणार आहे. या निमित्ताने प्रत्येक घरात रामायण वाचले पाहिजे. तसेच दिवे लावले पाहिजे असं देवकीनंदन ठाकूर म्हणाले. ज्या पद्धतीने आज आपण जानेवारीत राममंदिराची तयारी करत आहोत. तशीच येत्या जानेवारीत श्रीकृष्ण मंदिराची तयारी करा असे आवाहनही त्यांनी केले.

वेब सिरीजमुळे भारतीय संस्कृती खराब होत आहे. पवित्र नात्याचा अनादर होत आहे असा घणाघात देवकीनंदन ठाकूर यांनी केला आहे. हे थांबवण्यासाठी भारत सरकारला कठोर कायदा करण्याची विनंती आहे असेही ते म्हणाले. याशिवाय सनातन धर्माबद्दल अपशब्द काढणाऱ्यांना त्यांनी खडेबोल सुनावले आहे. सनातनला कोरोना, एचआयव्ही झाला असं म्हणणाऱ्यांना त्यांनी चांगलंच धारेवर धरले. आम्ही इतर कोणत्याही धर्माबद्दल बोलत नसताना तुम्ही आमच्या धर्माबद्दल असे अपशब्द कसे बोलू शकता? संवैधानिक पदावर बसलेले लोकं सनातन संकृतीचा असा अपमान करत असतील तर त्यांना निवडणूक लढवण्यासाठी आजीवन बंदी घालावी अशी प्रतिक्रीया देवकीनंदन ठाकूर यांनी दिली. देशात समांतर सरकार चालणार नाही.

हॅलो, मी मुख्यमंत्र्यांचा पीए बोलतोय...! 'एनडीसीसी'च्या प्रशासकांना तोतयाचा फोन

■नाशिक । सचिन कदम,

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून (एनडीसीसी) सक्तीच्या रजेवर असलेले तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश पिंगळे यांना कर्तव्यावर हजर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकाच्या नावे बनावट फोन आल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. याप्रकरणी बँकेचे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनी भद्रकाली पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार, अज्ञात मोबाइल क्रमांकधारकाविरुद्ध तोतयागिरी केल्याचा अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे. एनडीसीसी चे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चव्हाण हे बँकेच्या गेस्ट हाउसमध्ये असताना त्यांना एका मोबाइल क्रमांकावरून फोन आला. फोनवरून बोलणाऱ्या व्यक्तीने मुख्यमंत्र्यांचा स्वीय सहायक बोलत असल्याची बतावणी केली. मुख्यमंत्री साहेबांचा पीए कानडे बोलत असल्याचे सांगून सक्तीच्या रजेवर व चौकशी सुरू असलेले शैलेश पिंगळे यांना कामावर हजर करून घेण्यासंदर्भात संशयिताने सूचना केली. भद्रकाली पोलिस संबंधित मोबाइल क्रमांकावरुन संशयिताचा माग काढत आहे.

काय आहे प्रकरण?

दरम्यान, जून २०२३मध्ये गटसचिवांच्या बेकायदेशीर निधी अपहार प्रकरणाची ऑडिओ क्लिप बाहेर आल्यानंतर एनडीसीसी चे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेंद्र पिंगळे आणि स्वीय सहायक योगेश पाटील यांना प्रशासक प्रतापसिंग चव्हाण यांनी सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. तेव्हापासून पिंगळे हे रजेवर आहे.

'महागाईचा बोजा जनतेवर टाकला जातोय'; प्रियंका गांधी यांची सरकारवर टीका

■नवी दिल्ली, प्रगती शर्मा

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गेल्या १९ महिन्यांत तेलाच्या किमती २९ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. या काळात तेल कंपन्यांनी सहा महिन्यांत १.३२ लाख कोटी नफा कमावला आहे. मात्र त्यांच्या कमाईचा बोजा देशाच्या जनतेवर टाकला जातो आहे अशी टीका काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी केली आहे. काही अब्जाधीशांचे खिसे भरण्यालाच केंद्र सरकारचे प्राधान्य आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे देशात आज महागाई गगनाला भीडली आहे. गरिब आणि मध्यम वगार्ला जगणे कठीण होत चालले आहे. तथापि, सरकार जनतेला कोणताही दिलासा देण्यास तयार नाही. त्यांची प्राथमिकता काही मोजक्या उद्योगपतींना आहे असे प्रियंका गांधी मोदी सरकारला लक्ष्य करताना म्हणाल्या. दरम्यान, तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला आलेल्या अपयशानंतर पक्षात काही फेरबदल करण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रियंका गांधी यांच्याकडे असलेली उत्तर प्रदेशची जबाबदारी आता अन्य नेत्याकडे सोपवण्यात आली आहे. त्या आता केवळ सरचिटणीस म्हणून पक्ष संघटनेत सक्रिय राहणार आहेत. त्यांना देशभर प्रचाराला वेळ मिळावा म्हणून असे करण्यात आल्याचा दावा काँग्रेसच्या सूत्रांनी केला आहे.

थर्टी फर्स्टच्या रात्री १२०० पोलिसांची करडी नजर; अनुचित प्रकार घडल्यास कारवाई

■कल्याण।अनिकेत भंकाळ,

कल्याण आणि उल्हासनगर पोलिस परिमंडळाच्या हद्दीत थर्टी फर्स्टसाठी १२०० पोलिसांचा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ठिकठिकाणी नाका बंदी करण्यात आली आहे. नागरीकांनी नववर्ष स्वागताचा आनंद लुटावा. मात्र अनुचित प्रकार घडल्यास पोलिसांकडून कारवाई केली जाईल असे आवाहन अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांनी केले आहे. थर्टी फर्स्ट रात्री ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. विविध हा'टेल्स, धाबे यांना पोलिसांनी योग्य त्या सुचना दिल्या आहेत. रात्रीच्या वेळी दारु पिऊन गाडी चालवू नये.

हेल्मट घालूनच गाडी चालवावी. दारु पिऊन गाडी चालविल्यास ब्रेथ अ'नालझर यंत्राद्वारे तपासणी केली जाईल. दारु पिऊन गाडी चालविल्याचे आढळून आल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे नववर्ष स्वागताचा आनंद लूटावा. मात्र कायद्याचे उल्लंघन करु नये असे अप्पर पोलिस आयुक्त शिंदे यांनी सांगितले.

कल्याण आणि उल्हासनगर पोलिस परिमंडळाच्या हद्दीत प्रत्येकी आठ पोलिस ठाणी येतात. या ठिकाणी १२०० पोलिस तैनात करण्यात आले आहेत. कोंबिंग आणि सर्च आ'परेशन आज रात्रीपासून सुरु करण्यात आले आहे. १२०० पोलिसांमध्ये साध्या वेशातील पोलिसही फिरणार आहेत. तसेच दोन्ही पोलिस परिमंडळाच्या हद्दीतील सीसीटीव्ही द्वारेही नववर्षाच्या स्वागतावर नजर ठेवली जाणार आहे. नागरीकांनी नववर्षाचे स्वागत करीत असताना त्यांच्या सुरक्षेची हमी पोलिस प्रशासनाची असेल असे अप्पर पोलिस आयुक्त शिंदे यांनी सांगितले.

राममंदीर उद्घाटनावर संजय राऊतांची भाजपवर टीका, दिलीप वळसे-पाटलांनी दिलं प्रत्युत्तर

■ सातारा। भावना जैन,

शिवसेनेचे खासदार संजय राऊत हे मोठे नेते आहेत. ते नेहमीच वेगवेगळी विधान करत सल्ले देतात. प्रभू रामचंद्र हा सर्वांच्या आस्थेचा विषय आहे. त्यामुळे आपण देवाला देवाच्या जागी ठेवूया, असा सल्ला सहकारमंत्री दिलीप वळसे - पाटील यांनी खासदार संजय राऊत यांना दिला आहे. सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील हे आज रयत शिक्षण संस्थेच्या विविध कार्यक्रमांनिमित्ताने साताऱ्यात आले होते. संजय राऊत यांनी राममंदीर उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर भाजपवर टीका केली होती. भाजपने आता फक्त राम लल्लालाच निवडणुकीत उभं करायचं राहीलयं, अशी टीका केली होती. याबाबत वळसे पाटील यांना पत्रकारांच्या या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. अजित पवार यांना अध्यक्ष करण्यासाठी खासदार शरद पवारांनी बैठक बोलावली होती. मात्र, तेव्हा अजित पवार अध्यक्षपद नको म्हणाले होते, असा गौप्यस्फोट जयंत पाटलांनी केला होता. यावर दिलीप वळसे-पाटील म्हणाले, माज्यासमोर अशी चर्चा झाली नव्हती. मला त्याबाबत काहीही माहीत नाही, असं सांगत वळसे-पाटील यांनी यावर भाष्य करणे टाळले. दरम्यान जीगाव प्रकल्पात थेंबभर पाणी नाही. हे धरण अजून पूर्ण झालं नाही. मग ३३०० कोटींचं टेंडर कशासाठी? निव्वळ ठेकेदारांचे हित जोपासण्यासाठी आणि ठेकेदारांना निवडणुकीपूर्वी ३३०० कोटींचा ठेका देण्याचा प्रयत्न दिसतोय, असा थेट आरोप एकनाथ खडसे यांनी सरकारवर केला आहे.

अमोल कोल्हे आणि सहकाऱ्यांना मी धन्यवाद देतो; तुमचा आक्रोश देशभर पोचला- शरद पवार

■पुणे । दिगंबर जाधव,

आजचे सरकार शेतकऱ्याकडे ढुंकून पाहायला तयार नाही. शेतकऱ्यांना जगावे कसे हा प्रश्न आहे. तो प्रश्न मांडायचा प्रयत्न केला. तर सरकार त्याकडे ढुंकून पाहत नाही. देशाला कृषिमंत्री नाही, देश कसा चालणार, असा प्रश्न माजी केंद्रीय कृषिमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वात शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वात शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. त्याची सांगता सभा शनिवारी पुणे जिल्हाधिकार्यालयासमोर झाली. या मोर्चात बोलताना शरद पवार म्हणाले, शेतकरी सध्या अस्वथ आहे. नुकताच अमरवतीला गेलो होतो. तेथे वर्तमान पत्रात बातमी वाचली, दहा दिवसात २५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. देशाची भूक भागविणारा शेतकरी आत्महत्या करतो, ही गोष्ट छोटी नाही. मी कृषिमंत्री असताना शेतकरी आत्महत्या ची घटना घडली होती तेव्हा, प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांना घेऊन लातूर, यवतमाळ आणि वध्यार्ला गेलो होतो. तिथे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती.

गौतम नवलखा भीमा कोरेगाव दंगल प्रकरणी नजर कैदेत

■पुणे । अभिजीत येरल्लू,

भीमा कोरेगाव दंगल प्रकरणी नजर कैदेत असणारे गौतम नवलखा हे पुन्हा प्रकाश झोतात आले आहेत. शनिवारी दिल्ली पोलिसांनी काही प्रकरणाची त्यांची झाडाझडती घेतली. मात्र नेमकी कशाची चौकशी केली याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली आहे. १ जानेवारी २०१८ मध्ये भीमा कोरेगाव युद्धाला दोनशे वर्षे झाल्याच्या निमित्ताने मोठ्या संख्येने लोक जमा झाले होते. मात्र या ठिकाणी अचानक दंगल उसळली. त्या प्रकरणाची अद्याप चौकशी सुरू आहे. या प्रकरणात अनेकांना अटक झाली त्या पैकीच एक पत्रकार असलेले गौतम नवलखा हे आहेत. त्यांनी या घटनेनंतर झालेले आरोप फेटाळले होते. मात्र २०२० मध्ये राष्ट्रीय सुरक्षा समिती समोर त्यांनी शरणागती पत्करली. तेव्हापासून ते नवी मुंबई सीबीडी येथे ते न्यायालयाच्या आदेशाने नजरकैदेत आहेत. मात्र आज अचानक दिल्ली पोलीस या ठिकाणी धडकले व त्यांनी नवलखा यांची चौकशी सुरू केली. शनिवारी दिवसभर नवलखा यांच्याशी दिल्ली पोलिसांनी अनेक बाबतीत चौकशी केली मात्र त्याचा तपशील समजू शकला नाही.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

यात्रांची यातायात !

यात्रा व भारतीयांचे नाते तसे अतूटच. अनादिकाळापासून चालत आलेले. याकडे कधी कुतूहलाने तर कधी भक्तिभावाने बघणे अथवा त्यात सामील होणे हेही अनेकांच्या अंगात भिनलेले. मग ती पदयात्रा असो वा वातानुकूलित वाहनातून केलेली रथयात्रा. अलीकडे या यात्रांचे वेगाने होत असलेले राजकीयीकरण हा चिंतेचा विषय आहे असे अजिबात समजण्याचे काही कारण नाही. धार्मिक आणि राजकीय मुद्दयांची बेमालूम सरमिसळ केली जाण्याच्या या काळात असे होणारच. जोवर या यात्रांना सामोरे जाणारा वर्ग देशात मोठया प्रमाणात उपलब्ध आहे तोवर तरी या यात्रांना मरण नाही. त्यातून कुणाला किती लाभ होतो व कुणाला तोटा याचे गणित वेगळे. त्यावर जास्त डोके खाजवण्याची गरज नाही. मात्र, राजकीय नेत्यांची प्रतिमा उजळण्यात, त्यांच्याभोवती एक आगळेवेगळे वलय निर्माण करण्यात या यात्रांचा वाटा मोठा राहिला आहे, हे निर्विवाद सत्य. त्यामुळे केंद्र असो अथवा राज्य, प्रत्येक ठिकाणच्या नेतृत्वाला अशी एक तरी यात्रा आपण काढावी असे तीव्रतेने वाटू लागले आहे. परिणामी देशात अलीकडे या यात्रांचा सुळसुळाट झालेला दिसतो. तो योग्य की अयोग्य या वादात पडण्याचीही गरज नाही. या निमित्ताने नेत्याला थेट लोकांमध्ये मिसळता येते, त्यांच्याशी त्यांच्या क्षेत्रात जाऊन संवाद साधता येतो, अपेक्षित असलेली वातावरण निर्मिती करता येते. यात्रामार्गाच्या भागातील बाजारपेठही फुलते. हे फायदेही काही कमी महत्त्वाचे नाहीत. पूर्वी राजकीय नेते देशभर जाहीर सभा घ्यायचे. त्याला तेव्हा दौरे असे म्हणण्याची प्रथा होती. आता अशा सलग सभा-दौऱ्यांना यात्रा असे म्हणण्याची पद्धत रूढ झाली. हे दौरे हवाई असले तरी त्याला यात्राच म्हणावे असा हट्ट नेते धरताना दिसतात. याचे एकमेव कारण यात्रा या शब्दाला असलेल्या वलयात दडले आहे. काही शतकापूर्वी लोक यात्रेला- म्हणजे तीर्थाटनालाच- निघाले की अप्रूप म्हणून सारे गाव गोळा व्हायचे. सुखरूप परत या अशी कामना करायचे. ब्रिटिश लेखक जेफ्री चॉसर यांनी चौदाव्या शतकात लिहिलेल्या कँटरबरी टेल्स या पुस्तकात या यात्रांचे यथार्थ चित्रण आढळते. भारतात त्याच्याही आधी हा यात्रेचा भक्तिमार्ग चोखाळला गेला. अजूनही जात-पात, धर्म, पंथ असा भेद विसरायला लावणारी 'वारी' हे त्याचेच सुधारित रूप. देशात स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली व या यात्रांचे स्वरूप बदलले. त्या संघर्षांच्या मागार्चे प्रतीक म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. याचे श्रेय निर्विवादपणे महात्मा गांधींना. उण्यापुऱ्या शंभर जणांच्या सहभागातून त्यांनी काढलेली दांडी यात्रा आजही आठवली जाते ती त्यामुळेच. स्वातंत्र्यानंतर देशात काँग्रेस सत्तेवर आली. तिचा एकछत्री अंमल सुरू झाला. तो जसजसा एकाधिकारशाहीकडे झुकू लागला तसेतसे विरोधक एकवटू लागले. त्यातून जन्म झाला तो संपूर्ण क्रांती व नवनिर्माण आंदोलनाचा. त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी जयप्रकाश नारायण आदींनी आधार घेतला तो यात्रेचाच. त्याचे स्वरूप एवढे भव्य व व्यापक होते की सत्ताधाऱ्यांनी त्याची धास्ती घेऊन देशात आणीबाणीच घोषित केली. अर्धशतकापूर्वी लोकप्रिय झालेल्या त्या यात्रांचा दृष्टिकोन राजकीय जरूर होता, पण निवडणुकीपुरता नव्हता. विद्यमान सत्ताधीशांना पराभूत करा, पण आमच्याच हाती सत्ता द्या असा आग्रह त्यात ठळकपणे तरी दिसत नव्हता. नंतर विरोधक सत्तेवर आले. त्यांना ती सत्ता नीट सांभाळता आली नाही. त्यातून त्यांच्या ऐक्याची शकले झाली. यातून उदयाला आलेल्या भाजपने नंतरच्या काळात या यात्रांना शुद्ध राजकीय रूप दिले. त्यासाठी आधार घेतला तो धार्मिक मुद्दयाचा. राम मंदिरासाठी निघालेली रथयात्रा हे त्यातले सर्वोच्च उदाहरण. याने लालकृष्ण अडवाणींना नाव व कीर्ती मिळवून दिलीच, पण ही यात्रा रोखण्याचे धाडस कायद्यानुसारच दाखवणारे लालूप्रसाद यादवसुद्धा लोकांच्या स्मरणात राहिले. यात्रा हे राजकीय यशाचे हुकमी साधन आहे हा समज जनमानसात रुजवण्यात भाजपचा वाटा मोठा राहिला आहे. आज राहुल गांधी नेमक्या त्याच वाटेने निघाले आहेत. या दोहोतला फरक हाच की काँग्रेसने हे यात्रा प्रकरण यशस्वी करण्यासाठी धर्माचा आधार घेतला नाही. राहुल गांधींच्या पहिल्या भारत जोडो यात्रेत त्यांच्या पायी चालण्याचे फार कौतुक झाले. याच नावाचा आधार घेत प्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटेंनी काही दशकांपूर्वी देशात शांतता नांदावी म्हणून भारत जोडो यात्रा काढली होती. त्यात सामील झालेले हजारो तरुण दहशतवाद संपावा म्हणून देशभर फिरले. शांतीचा संदेश देणारी ही यात्रा राजकीय नव्हती. काँग्रेसची आधीची व आत्ताची भारत न्याय यात्रा राजकीय हेतूने प्रेरित नाही असा दावा या पक्षाकडून केला जात असला तरी त्यात फारसे तथ्य नाही. पहिल्या यात्रेनंतर काही राज्यांत झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला मिळालेल्या यश व अपयशाची तुलना भारत जोडो शी केली गेलीच. सत्तेचा होणारा गैरवापर, नियामक संस्थांमध्ये होत असलेला हस्तक्षेप, लोकशाहीचे वेगाने होत चाललेले खच्चीकरण, हुकूमशाही पद्धतीकडे होणारी वाटचाल, धार्मिक विद्वेषाचा पेटलेला वणवा, संघराज्य प्रणालीला निर्माण झालेला धोका, एकपक्षीय व एक व्यक्तिकेंद्रित झालेले राजकरण यासारख्या असंख्य मुद्दयांकडे काँग्रेसची यात्रा लक्ष वेधत असली तरी त्याचे अंतिम ध्येय हे सत्ताप्राप्तीचे आहे हे कुणीही अमान्य करणार नाही. सत्ता मिळवण्यासाठी यात्रा हे लोकशाहीतले एक प्रमुख आयुध ठरले आहेच पण याच यात्रांचा आधार घेत देशात सत्तेवर आलेला भाजपसुद्धा आता सत्ता टिकवण्यासाठी याच अस्त्राचा वापर करताना दिसतो. सध्या सुरू असलेली केंद्राची संकल्प यात्रा हे त्याचे प्रतीक. अर्थात या यात्रेत सत्तेची सारी सूत्रे हाताळणारे मोदी व शहांसारखे नेते नाहीत, पण केंद्र आणि राज्य सरकारांची प्रशासकीय यंत्रणा भाजपच्या ध्वजाचे रंग असलेल्या या यात्रेसाठी राबते आहे. अनेक मंत्र्यांना त्याच्या यशस्वितेसाठी कामाला जुंपले गेले आहे.

FERTILITY-FRIENDLY DIET : 12 FOODS THAT CAN EMPOWER

The journey to conception is a delicate and intricate process, with a woman's reproductive health playing a pivotal role. Beyond medical interventions, a well-balanced and nutrient-rich diet can significantly contribute to optimizing female fertility. Nutrient-rich foods: In the quest for fertility, the importance of a nutrient-rich diet cannot be overstated. Include a variety of colourful fruits and vegetables to ensure a broad spectrum of vitamins, minerals, and antioxidants. These elements are vital for overall health and reproductive well-being. Healthy Fats: Incorporate sources of healthy fats, such as avocados, nuts, seeds, and olive oil, into your diet. These fats play a crucial role in hormone production and balance, which are key factors in fertility. Inclusion is chia seed, flax seed, walnut, and almonds as a source of good fat. One should avoid refined oil. Lean Proteins: Opt for lean protein sources like poultry, fish, beans, and legumes. Protein is essential for building and repairing tissues, and it aids in maintaining hormonal balance critical for reproductive health. Two or more servings of fish per week have been shown to improve fertility due to high omega-3 content. Avoid red meat consumption Complex Carbohydrates: Choose complex carbohydrates over refined ones. Whole grains, quinoa, and oats provide sustained energy and help regulate blood sugar levels. Stable blood sugar is crucial for hormonal balance and fertility. Iron-rich foods: Iron is vital for reproductive health. Include iron-rich foods like lean meats, beans, spinach, and fortified cereals to prevent anaemia, which can affect fertility. Folate and Folic Acid: Adequate folate intake, found in leafy greens, citrus fruits, and legumes, is crucial for preventing neural tube defects in early pregnancy. Folic acid supplements are often recommended for women planning to conceive. Dairy or Dairy Alternatives: Calcium is essential for reproductive health, and dairy or fortified dairy alternatives are excellent sources. Include milk, yoghurt, or plant-based alternatives to support bone health and overall fertility. Full cream milk is preferred to skimmed milk for improving fertility Hydration: Staying well-hydrated is fundamental for overall health, including reproductive health. Water aids in digestion, and nutrient absorption, and helps maintain cervical mucus consistency, which is essential for conception. Limit Processed Foods: Processed foods often contain unhealthy trans fats, additives, and excessive sugars, which can contribute to inflammation and hormonal imbalances. Limiting the intake of processed foods supports overall reproductive health. Intake of processed and fast food has been shown to reduce fertility almost by 40-50% Caffeine and Alcohol Moderation: While moderate caffeine intake is generally considered safe, excessive consumption may interfere with fertility. Likewise, limiting alcohol intake is advisable, as excessive alcohol can affect hormonal balance. Smoking, tobacco, or any form of addiction is detrimental to fertility in men and women Mindful Eating and Weight Management: Practicing mindful eating and maintaining a healthy weight are crucial aspects of fertility. Being underweight or overweight can impact hormonal balance and disrupt the menstrual cycle. Herbal Teas and Supplements: Some herbal teas, like red raspberry leaf tea, are believed to support fertility. However, it's essential to consult with a healthcare provider before incorporating herbal supplements, as their safety and efficacy can vary.

'सूर नवा, ध्यास नवा' शो घेणार निरोप, 'या' दिवशी रंगणार ग्रँड फिनाले !!

'सूर नवा, ध्यास नवा' शो घेणार निरोप, 'या' दिवशी रंगणार ग्रँड फिनाले !! कलर्स मराठीवरील 'सूर नवा ध्यास नवा-आवाज तरुणाई' चा या पवार्ला प्रेक्षकांनी खूप प्रेम दिले. 'जुनं ते सोनं, पण नवंही हवं' हा प्रयोग प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरला. या पवार्तील सगळेच स्पर्धक उत्तम असून यांपैकी सर्वोत्तम ६ पर्वाच्या शेवटी येऊन पोहोचले आहेत. आवाज तरुणाईचा या पवार्चा ग्रॅण्ड फिनाले जवळ आला आहे. सूर नवा ध्यास नवा - आवाज तरुणाईचा अंतिम सोहळा सर्वोत्तम ६ स्पर्धकांचा कमाल परफॉर्मन्स आणि मराठी सिनेसृष्टीतील लाडक्या कलाकारांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. हा सोहळा दिमाखदार अंदाजात साजरा होणार आहे. हा अद्वितीय उत्सव, या पर्वाच्या सर्वोत्तम ६ स्पर्धकांचा कमाल परफॉर्मन्स, भव्य नृत्य प्रदर्शन आणि मराठी सिनेसृष्टीतील प्रतिष्ठित कलाकारांसोबत साजरा होणार आहे.हा अतुलनीय उत्सव केवळ मंत्रमुग्ध करणाऱ्या गाण्यांचा नसून बॉलिवूड धक धक गर्ल माधुरी दीक्षित, दिग्गज कलाकार नाना पाटेकर, विनोदाचे बादशाह मकरंद अनासपुरे आणि आपल्या मधुर आवाजाने सर्वांना मंत्रमुग्ध करणाऱ्या गायिका साधना सरगम यांसारख्या प्रतिष्ठित कलाकारांच्या हजेरीने हा सोहळा आणखीनच ग्रॅण्ड होणार आहे. थर्टी फर्स्टचा प्लॅन दिमाखात साजरा करण्यासाठी 'सूर नवा ध्यास नवा - आवाज तरुणाईचा' ग्रॅण्ड फिनाले रविवार, ३१ डिसेंबर, संध्याकाळी ७ वाजता लाडक्या कलर्स मराठीवर पाहा.

निळू फुलेंच्या जावयाची मराठी सिनेमात एन्ट्री, '3 इडियट्स' फेम चतुरसोबत झळकणार

अभिनयाचा वाहता झरा म्हणजे निळू फुले. भारदस्त आवाजामुळे अनेकांच्या मनात भीती निर्माण करणाऱ्या या अभिनेत्याने मराठी सिनेसृष्टीला वेगळ्या उंचीवर नेले. अगदी बॉलिवूडमध्येही त्यांनी आपल्या अभिनयाचा डंका गाजवला. निळू फुलेंची लेक गार्गी फुले देखील अभिनेत्री आहे. 'तुला पाहते रे' मालिकेतून ती घराघरात पोहोचली. तर आता गागीर्चा नवरा म्हणजेच निळू फुलेंचा जावई सुद्धा मराठी सिनेमात झळकणार आहे. आगामी 'आईच्या गावात मराठीत बोल' या सिनेमात ओंकार थत्ते यांची भूमिका आहे. '3 इडियट्स' फेम अभिनेता ओमी वैद्य ज्याला सर्वच चतुर नावाने ओळखतात तो मराठी सिनेमात पदार्पण करत आहे. त्याचा 'आईच्या गावात मराठीत बोल' प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. याच सिनेमात निळू फुलेंचे जावई ओंकार थत्ते यांनीही काम केले आहे. सिनेमात मराठी शिकण्यासाठी ओमी वैद्य ओंकार थत्तेंची मदत घेताना दाखवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांची भूमिकाही कॉमेडी असणार आहे. या सिनेमातून ते अभिनयात पदार्पण करत आहेत. तर ओमी वैद्यही पहिल्यांदाच मराठी सिनेमात झळकत आहे. याशिवाय सिनेमात पार्थ भालेराव, संस्कृती बालगुडे, नेहा कुलकर्णी, विद्याधर जोशी, इला भाटे, उदय टिकेकर, अभिषेक देशमुख यांचीही मुख्य भूमिका आहे.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा'कडून प्रेक्षकांना 31st डिसेंबरला असणार खास हास्याची मेजवानी

संपूर्ण महाराष्ट्राला खळखळून हसायला लावणारा कार्यक्रम म्हणजे महाराष्ट्राची हास्यजत्रा. या कार्यक्रमातील प्रत्येक कलाकाराने त्यांच्या विनोद बुद्धीच्या जोरावर आणि अभिनयाच्या ताकदीमुळे प्रेक्षकांच्या मनात हक्काचं स्थान निर्माण केलं आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे रिपिट टेलिकास्टही प्रेक्षक तितक्याच आवडीने पाहतात. विशेष म्हणजे ३१ डिसेंबरला हा कार्यक्रम प्रेक्षकांचं खास मनोरंजन करणार आहे. येत्या ३१ डिसेंबरला सोनी मराठीवर संपूर्ण दिवसभर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचे वर्षभरातील प्रहसने दाखवली जाणार आहेत. तसंच रात्री ९ वाजता हास्याची नॉनस्टॉप पार्टी सुद्धा पाहायला मिळणार आहे. या वर्षभरातील तणावपूर्ण जीवनशैलीतून काही घटका आनंद घेता यावा म्हणून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' वर्षअखेरीस संपूर्ण दिवस आपल्या भेटीस येणार आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मालिकेच्या चाहत्यांसाठी ही गोष्ट आनंद द्विगुणित करणारी आणि औत्सुक्याची असणार आहे!

तिशीनंतर दिसणारी 'ही' लक्षणे ओरडून सांगतात, 'किडनी डॅमेज झालीय'

वयानुसार, शरीरात अनेक बदल दिसून येतात, जे सामान्य असतात. जसे की, शरीरातील वाढत्या वयानुसार शरीराची शक्ती आणि उर्जा दोन्ही वाढते. तर जेव्हा शरीर प्रौढतेपासून बालपणात जाते तेव्हा शरीराची शक्ती किंवा ऊर्जा कमी होत नाही. जी पूर्णपणे सामान्य बाब आहे. पण काही वेळा वयाच्या आधीच शरीरात काही बदल होऊ लागतात, जे किडनीसारख्या गंभीर अवयवाला नुकसान होण्याचे लक्षण असू शकतात. या लेखात आपण वयाच्या तिशीमध्ये दिसणारी काही लक्षणे सांगणार आहोत जी किडनी खराब होण्याचे लक्षण असू शकतात. वयाच्या तिशीमध्ये एखाद्या व्यक्तीला ही लक्षणे दिसली तर त्याने एकदा आपल्या किडनीची तपासणी करून घ्यावी.

पेटके / क्रॅम्प येणे : स्नायूंच्या क्रॅम्पची समस्या सामान्यतः वयाच्या 50 नंतरच दिसून येते कारण या वयात स्नायू कमकुवत होतात. परंतु वयाच्या ३० वर्षापूर्वीच अशी लक्षणे दिसणे हे काही वेळा गंभीर आजाराचे लक्षण असू शकते, ज्यामध्ये किडनीशी संबंधित आजारांचाही समावेश होतो.

खाज येणे : त्वचेवर खाज येण्याची समस्या कोणत्याही वयात उद्भवू शकते, परंतु अशी लक्षणे वयाच्या 40 नंतर अधिक दिसतात कारण या वयानंतर त्वचा वृद्ध होणे सुरू होते. तर ज्या लोकांना ३० वर्षापूर्वी अशी लक्षणे दिसतात त्यांच्यासाठी ही गंभीर समस्या असू शकते.

पायाला सूज येणे : साधारणपणे, वयाच्या 50 नंतर, लोकांना त्यांच्या पाय किंवा घोट्याला सूज येण्यासारखी लक्षणे जाणवू लागतात. परंतु ३० वर्षांच्या आधी लोकांमध्ये त्वचेवर खाज येण्यासारखी लक्षणे दिसू लागली, तर ती गंभीर स्थिती असू शकते, जी लवकरात लवकर सोडली पाहिजे.

HEALTH AND SPORTS

"WHY VIRAT KOHLI IS NOT CAPTAIN OF TEST TEAM?": SUBRAMANIAM BADRINATH

MUMBAI: After facing a defeat against South Africa in the first test match, former Indian cricket Subramaniam Badrinath questioned why star batsman Virat Kohli is not leading the team in the Test and also added that Rohit Sharma is not a proven opening batsman in overseas conditions. Rohit Sharma-led Indian team lost the first test match against South Africa within just three days by an innings and 32 runs. Since 1992-93 India's dream of winning a test series against South Africa on South African soil has not come into reality. "Kohli has a great record as a test leader. He has scored more than 5000 runs with an average of 52+ as a captain. He has 40 wins and 17 losses in 68 tests. He led us to a tremendous victory in the Australia series. He has the most wins as Test captain after Graeme Smith, Ricky Ponting and Steve Waugh," Subramaniam Badrinath said on his YouTube channel. Virat Kohli has captained India in 68 test matches out of which the team have come victorious on 40 occasions, have lost 17 games and 11 matches ended in a draw. His win percentage is over 58 per cent. Under Kohli's captaincy, India has won a series in Australia and has registered many test wins and series wins in England, South Africa, West Indies and Sri Lanka. As a captain, Virat scored 5,608 runs in Tests at an average of 53.40, with 18 centuries and 18 fifties in 111 innings and the best score of 254*. Under his leadership, India was the number-one Test team for multiple years in a row. "Why is he (Virat) not the captain of the Test team? I want to raise this valid question. He is a better test batter.

EX-INDIA BOWLER LAMBASTS ROHIT, DRAVID'S CALL TO PICK PRASHID KRISHNA

NEW DELHI : The fact that the India hurriedly summoned Avesh Khan to the squad for the second match in Cape Town indicates that Prasidh is likely to be dropped Prasidh Krishna had a forgettable Test debut against South Africa. He was wayward, bereft of ideas and lacked the basic discipline of Test match bowling. In many ways, his below-average performance was one of the main reasons why India could not put any pressure on the South African batters whenever Jasprit Bumrah and Mohammed Siraj were taken off the attack. Captain Rohit Sharma said that they would back the young right-arm pacer after the humiliating loss by an innings and 32 runs in Centurion. But the fact that the Indian team management hurriedly summoned Avesh Khan to the squad for the second match in Cape Town indicates that Prasidh is likely to be dropped from the XI. Avesh is currently playing the second unofficial match between India A and South Africa A and has taken a five-wicket haul in the first innings. The reason behind the team management's decision to play Prasidh ahead of Mukesh Kumar was purely because of the success tall hit the deck bowlers get on the South African pitches. Historically, bowlers who can extract more bounce from the surface have done well here but Prasidh was way off his line and length to bring that theory into play. "Poor Prasidh... The kid isn't ready for Test cricket. He doesn't have skills to bowl second and third spells yet. They went with him based on his ability to hit the deck. But they forgot when has he last played a proper season of Ranji Trophy? Just one India A game isn't enough," a former India bowler told PTI.

HARBHAJAN OUTLINES INDIA'S 'CLUELESS' ACT AFTER SA TEST LOSS

NEW DELHI : More than Rahane, Harbhajan was hurt by Pujara's absence, who he feels has contributed to India's past few Test wins in Australia and England as much as Kohli It was called as India's best-ever chance to conquer the final frontier, one the nation has failed in the last 31 years in Test cricket, but the hopes and dreams were shattered in a mere three days as South Africa defeated the Rohit Sharma-led side by an innings and 32 Test in the opening game in Centurion to take an unassailable lead in the two-match series. Following the loss, Team India and their tactical choices in the game and the build-up to it have been immensely criticised. On Friday, former India cricketer Harbhajan Singh joined the bandwagon as he outlined a "clueless" act by the BCCI selectors. Harbhajan, speaking on his YouTube channel on the Centurion clash, questioned the logic behind dropping Ajinkya Rahane and Cheteshwar Pujara from the squad. While the former had made his return to the Test team earlier in 2023 after being dropped in March 2022, and played a crucial knock, albeit in a losing cause, in the World Test Championship final against Australia, before being named as the vice-captain in the West Indies tour in August, Pujara last made an appearance for India in the WTC game against Pat Cummins' team. More than Rahane's absence, the legendary off-spinner was hurt by the absence of Pujara, who he feels has contributed to India's past few Test wins in Australia and England as much as Virat Kohli. Pujara was the second-highest run-scorer for India in the previous WTC cycle where he amassed 928 runs at an average of 32.00, while Kohli was the only player ahead of him with 932 at 32.13.

SUPERFOOD PRUNES: KNOW THESE 5 BENEFITS OF DRIED PLUMS

Don't let their wrinkled appearance fool you, dried plums (prunes) are nutritional marvels packed with benefits that go far beyond just relieving occasional constipation. These little morsels are nature's candy, bursting withvitamins, minerals, and fibre, ready to boost your health in delicious ways. So, ditch the prune stereotypes and dive into the 5 amazing benefits of including these dried delights in your diet. Digestive delight:Prunes are notorious for their fibre content. A single serving boasts a whopping 3 grams of fibre, both soluble and insoluble. This keeps things moving smoothly, tackling constipation and promoting regular bowel movements. But the benefits extend beyond regularity. Insoluble fibre bulks up stool, while soluble fibre feeds your gut's good bacteria, supporting overall digestive health. Diabetic-friendly fruit:Despite their inherent sweetness, prunes possess a low glycemic index. This means they have a minimal impact on blood sugar levels, making them a suitable choice for individuals looking to manage their blood sugar. However, it's crucial to exercise moderation, particularly for those with diabetes. Promotes bone health:Vitamin K, a key component in prunes, plays a crucial role in bone health. Involved in both blood clotting and bone metabolism, vitamin K contributes to maintaining robust and healthy bones. Including prunes in your diet may aid in fortifying your skeletal structure.Cardiovascular support:Scientific studies suggest that prunes may be instrumental in promoting heart health. The combined effects of fibre, potassium, and antioxidants in prunes contribute to lowering blood pressure and reducing the risk of cardiovascular diseases. Incorporating prunes into a heart-healthy diet may offer notable benefits for cardiovascular well-being. Antioxidant-rich profile:Prunes boast an impressive array of antioxidants, including phenolic compounds and beta-carotene. These antioxidants play a pivotal role in neutralizing free radicals, thereby safeguarding cells from oxidative stress. Regular consumption of prunes can contribute to cellular and overall health.

REDUCES RISK OF CANCER AND DIABETES : KNOW ABOUT 7 LESSER KNOWN BENEFITS OF PINK GUAVA

Many fruits available in winter are not only tasty but also beneficial for health. Pink guava is one of these fruits, which is the favorite fruit of many people. Eating it provides many health benefits. Many nutrients are found in it, which help in providing relief from many health-related problems. Generally, two types of guavas are found. One is white on the inside and the other is red or pink on the inside. Both guavas are very beneficial for health. However, eating red guava provides more health benefits. If you are also fond of eating guava and often buy pink guava know about its lesser-known benefits here: 1. Beneficial for diabetes: This type of guava contains abundant amounts of fiber and water. This is the reason why it proves to be a good fruit for people with diabetes. It also reduces gastric problems and helps avoid blood glucose spikes. 2. Reduces risk of cancer: Pink guava contains antioxidants that can help prevent the growth of cancer cells. 3. Increases immunity: Pink guava is rich in Vitamin C, which is beneficial for healthy skin. It also boosts the immune system and helps in quick wound healing. 4. Helpful in weight loss: It contains high amounts of water and fiber content as well as other nutrients, making it a great option for people looking to lose weight. 5. Reduces bad cholesterol: Pink guava contains insoluble fiber as well as many other types of fiber, which helps in reducing the level of LDL or bad cholesterol.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

...आणि हाती झाडू घेऊन मुख्यमंत्र्यांची ठाण्यात रस्ते सफाई

■ठाणे । प्रतिनिधी,

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील सर्वंकष स्वच्छता मोहीम शनिवारपासून ठाण्यात सुरू झाली आहे. या मोहिमेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हाती झाडू घेऊन रस्त्याची सफाई करण्यास सुरुवात केली. त्यामुळे ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि पोलीस आयुक्त अशुतोष डुंबरे यांच्यासह सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी हाती झाडू घेऊन रस्ते सफाईसाठी झाडून कामाला लागल्याचे चित्र होते. आपले घर स्वच्छ ठेवतो. त्याप्रमाणे आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. तरच ठाणे निरोगी होईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यभरात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल असेही ते म्हणाले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील ठाणे ते दिवा या शहरांत एकूण नऊ प्रभाग समित्या आहेत. त्या सर्व प्रभाग समिती क्षेत्रात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेची सुरूवात शनिवारी वागळे इस्टेट येथील रोड क्रमांक २२ मधून झाली. शनिवारी सकाळपासूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या मोहिमेत सहभागी झाले होते. यावेळी माजी आमदार रविंद्र फाटक, ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त अशुतोष डुंबरे, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, माजी लोकप्रतिनिधी, शाळा-महाविद्यायातील विद्यार्थी आणि सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक मोहिमेत सहभागी झाले.

एकनाथ शिंदे यांनी सुरुवातीला हातमोजे घालून जलवाहिनी हाती घेतली आणि रस्ते, पदपथालगतच्या भिंती धुण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी रस्ते साफ-सफाईसाठी हातामध्ये झाडू घेतला. मुख्यमंत्र्यांच्या हाती झाडू आल्याने महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि पोलीस आयुक्त अशुतोष डुंबरे यांनीही हाती झाडू घेऊन रस्ते झाडलोट करण्यास सुरुवात केली. या मोहिमेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. येथे भजनी मंडळही उपस्थित होते. त्यामध्येही ते सहभागी झाले. सर्वंकष स्वच्छता मोहिमेत आता नागरिक सहभागी होऊ लागले आहेत. त्यामुळे टप्प्याटप्प्याने राज्यात ही मोहीम राबविण्यात येईल असे एकनाथ शिंदे म्हणाले. हवेतील धुलिकण कमी करण्यासाठी वृक्षारोपन केले जाणार आहे. आपले घर स्वच्छ ठेवतो. त्याप्रमाणे आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. तरच ठाणे निरोगी होईल असेही शिंदे म्हणाले

नववर्ष स्वागतानिमित्ताने साडे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त

■ठाणे । प्रतिनिधी,

नववर्ष स्वागतानिमित्ताने अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणे पोलिसांचा सुमारे साडे पाच हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा फौजफाटा ठिकठिकाणी तैनात असणार आहे. तसेच गैरकृत्य टाळण्यासाठी ड्रोन आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या साहाय्याने पोलीस नजर ठेवणार आहे. मद्यपी वाहन चालकांविरोधात कारवाई करण्यासाठी पूर्वी २५ श्वास विश्लेषक यंत्र उपलब्ध होते. यामध्ये आता आणखी १८ यंत्रांची वाढ झाली आहे. तसेच ह्यऑल आऊटह्ण मोहीम सुरूच राहणार आहे अशी माहिती ठाण्याचे सह पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे यांनी यांनी दिली. नववर्ष स्वागतानिमित्ताने रविवार असल्याने रात्रीच्या वेळेत नागरिक मोठ्याप्रमाणात बाहेर पडण्याची शक्यता आहे. नववर्ष स्वागत शांततेमध्ये पार पडावे. तसेच शहरात अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणे पोलीस सज्ज झाले आहेत. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात साडे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. यामध्ये सर्व पोलीस ठाण्यांतील अधिकारी कर्मचारी, गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक, वाहतुक पोलीस, शीघ्र कृती दलाच्या अधिकाऱ्यांचा सामावेश असणार आहे. आयुक्त अशुतोष डुंबरे डुंबरे हे देखील बंदोबस्ताची पाहणी करणार आहेत. काही ठिकाणी साध्या वेशातील पोलीस बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर या दिवशीच्या रात्री शहरातील मुख्य चौक, रस्ते, तलाव परिसर परिसरात अनुचित प्रकार टाळण्यासाठी गस्ती पथके आणि नाकाबंदी केली जाणार आहे. विनयभंग, मोबाईल खेचून नेणे इत्यादी प्रकार रोखण्यासाठी दामिनी पथक, छेडछाड विरोधी पथक, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. ठाणे वाहतुक पोलिसांकडून शहरातील सर्व प्रवेशद्वारावर विशेष नाकाबंदी केली जाणार आहे. येथे श्वास विश्लेषक यंत्रांद्वारे मद्यपी वाहनांवर कारवाई केली जाणार आहे.

'माझी ओळख', 'काम, समर्पण आणि निष्ठा'; ठाण्यात झळकले निष्ठेचे होर्डिंग

■ठाणे । प्रतिनिधी,

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात जागोजागी निष्ठेचे होर्डिंग झळकले आहे. आगामी वर्ष निवडणुकांचे असल्याचे बॅनरमध्ये नमूद करत नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या बॅनरवर मविआ नेत्यांचे फोटो झळकले असून शुभेच्छुक म्हणून कोणत्याही व्यक्ती अथवा नेत्याचे नाव नमूद न करता 'माझी ओळख' या वाक्याखाली 'काम, समर्पण आणि निष्ठा' असा उल्लेख केला आहे. मात्र या निनावी बॅनरची शहरात जोरदार चर्चा सुरु आहे. याआधीही शहरात निनावी बॅनर लागल्यानंतर उलटसुलट राजकीय चर्चा रंगतात. शुक्रवार रात्रीपासून ठाण्यातील नागरिकांचे लक्ष वेधले आहे. येणारे वर्ष हे निवडणुकांचे वर्ष आहे. नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा अशी पोस्टरबाजी या बॅनरद्वारे करण्यात आली आहे. या बॅनरवर काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे, शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे यांचे फोटो झळकले आहेत.

शुभेच्छुकाने लक्ष वेधले

शुभेच्छुक म्हणून बॅनरवर काम, समर्पण आणि निष्ठा असा उल्लेख असल्याने बॅनरद्वारे नेमका कोणाला टोला हाणला, अशीही चर्चा सुरु आहे.

प्रमुख चौकात बॅनरबाजी

ठाण्यातील हरीनिवास, खोपट जांभळी नाका, नितीन कंपनी, कळवा या भागात महत्वाच्या चौकाचौकात या आशयाचे बॅनर लागले आहेत.

भगवा डाळिंब खात आहे भाव; राजस्थान, मराठवाडा आणि सोलापूरातून मोठी आवक

■नवी मुंबई । प्रतिनिधी,

नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळ बाजारात डाळिंबाची आवक वाढली असून भगवा या जातीच्या डाळिंबांना प्रचंड मागणी आहे. लाल चुटुक आणि साखरेप्रमाणे गोड असणाऱ्या या डाळिंबांनी फळ बाजार सजले आहेत. हिवाळ्यात आता डाळिंब भाव खाऊन जात आहे. हाडे मजबूत करण्यासाठी डांळिंब खाण्याचा सल्ला आजीच्या बटव्यात हमखास आढळतो. नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या राजस्थान येथून डाळिंबाची आवक वाढली असून ठोक बाजारात ५० ते १०० रुपये प्रतिकिलो ही डाळिंब मिळत आहेत. दुसरीकडे याच भगवा जातीचे मात्र महाराष्ट्रातील बीड, संभाजी नगर सोलापूर धाराशिव जिल्ह्यातून डाळिंब दाखल होत आहेत. मात्र महाराष्ट्रातील डाळिंबांना प्रति किलो ७० ते १५०रुपये दर मिळत आहे. राज्यातील डाळिंबाचे बी आकाराला छोटे व रस जास्त तर राजस्थान डाळिंबात बी काहीसे जाड व महाराष्ट्र डाळिंबाच्या मानाने रस कमी असतो. त्यामुळे राज्यातील डाळिंबांना तुलनेने चांगला भाव मिळत आहे अशी माहिती डाळिंबाचे व्यापारी हर्षल जेजुरीकर यांनी दिली.

'एक्साईज' विभागाने पहिल्यांदाच केली अशी कारवाई, हातभट्टी दारू विक्रेता स्थानबद्ध

■यवतमाळ। प्रतिनिधी,

अवैधरीत्या हातभट्टी दारू गाळप करून विक्री करणाऱ्या कुख्यात आरोपीविरुद्ध ह्यएमपीडीएह्णचा आदेश पारीत होताच आरोपीला अकोला कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने यवतमाळच्या इतिहासात या प्रकारची केलेली ही पहिलीच कारवाई असल्याचे सांगितले जाते. अमर राजू दातार (३५, रा. राणी अमरावती, ता. बाभूळगाव), असे एमपीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबद्ध करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी अवैध हातभट्टी दारू गाळप करून विक्री करण्याचा व्यवसाय अनेक वषार्पासून करत आहे. यापूर्वी त्याचा हातभट्टी दारू अड्डा उद्धवस्त करून गुन्हेही नोंदविण्यात आले आहेत. तरीही तो हातभट्टी दारू गाळप करून विक्री करतच होता. हातभट्टी दारू विक्रीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाच्या वतीने जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे एमपीडीएचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. जिल्हादंडाधिकारी डॉ. पकंज आशिया यांनी आदेश पारीत करताच अमर दातार याला अकोला कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नीतेश शेंडे यांच्या मार्गदर्शनात भरारी पथकाने केली.

बेकायदेशीर मद्य वाहतुक, विक्रीवर उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर; पालघर जिल्ह्यात चार भरारी पथकांची नियुक्ती

■वसई । प्रतिनिधी,

३१ डिसेंबर व नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर मागार्ने मद्याची विक्री व वाहतूक होत असते. असे प्रकार रोखण्यासाठी पालघर जिल्ह्याच्या उत्पादन शुल्क विभागाकडून करडी नजर ठेवली जाणार आहे. जिल्ह्यात चार भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहे.डिसेंबर महिन्याच्या सुरवातीपासून लोकांना नवीन वर्षाच्या स्वागताचे वेध लागतात. त्यानिमित्ताने हॉटेल्स , रिसॉर्ट, फार्म हाऊस, अशा विविध ठिकाणी पार्ट्या आयोजित केल्या जात असतात. यामध्ये मद्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात असल्याने मद्याचा वापरही होत असतो. यासाठी मद्याचे परवाने न घेताच विविध ठिकाणी बेकायदेशीर मद्याची वाहतूक व विक्री केली जाते. तसेच काहीवेळा सिल्वासा , दमण या भागात मद्य स्वस्तात मिळत असल्याने छुप्या मागार्ने हा मद्यसाठा शहरात आणण्याचा प्रयत्न केला जातो. याला रोखण्यासाठी टोलनाका, इतर विविध ठिकाणच्या भागात वाहनांवर लक्ष ठेवून तपासणी केली जाणार आहे. यासाठी कार्यकारी अधिकारी व जवानांना सोबत घेऊन चार पथके स्थापन केली आहेत. ही पथके आठ तालुक्यात विविध भागात नाकेबंदी करुन अचानकपणे गस्त घालतील व गुप्त पध्दतीने कोणालाही संशय येऊ नये म्हणून साध्या वेशात सुध्दा माहिती काढून अवैध धंदे करणाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे अशी माहिती पालघर जिल्हा उत्पादन शुल्क विभागाकडून सांगण्यात आले आहे.अवैधपणे गुजरात राज्यात बेकायदेशीरपणे मद्य जाणार नाही व दमण, दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशमधून अवैधपणे मद्याची तस्करी होवुन महाराष्ट्र राज्यात येणार नाही यावर ही विशेष लक्ष दिले जाणार आहे.

विजेचा शॉक लागून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ठाणे। प्रतिनिधी,

महावितरणच्या डीपीजवळ उघड्या केबलमधील विद्युत संचार घराच्या लोखंडी सीडीमध्ये आल्याने सीडीला हात लावणाऱ्या ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी सूत्रांनी दिली. वर्तकनगर पोलिस ठाण्यात या मृत्यूची नोंद करण्यात आलेली असल्याची माहिती आहे. वर्तकनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाटीलवाडी, सावरकर नगर परिसरात शनिवारी संध्याकाळच्या सुमारास ही घटना घडली. या ठिकाणी असलेल्या पोट माळ्यावर चढण्यासाठी लोखंडी शिडी ही महावितरणच्या डीपीजवळच बसविण्यात आली आहे. याठिकाणी अनेक विद्युत केबल उघड्यावर असल्याने यातील विद्युत प्रवाह या लोखंडी शिडीमध्ये उतरला. यावेळी अलोक नावाच्या मुलाने या शिडीला हात लावल्याने विजेच्या झटक्याने अलोकच मृत्यू झाल्याची घटना घडली. दरम्यान याचवेळी एका महिलेलाही विजेचा झटका लागला मात्र तिने त्वरित शिडी सोडून दिल्याने ती बचावली. यामध्ये अलोकने शिडी घट्ट धरल्याने त्याचा मृत्यू झाला. याबाबत स्थानिक रहिवाशांकडून व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रियेत विद्युत चोरीच्या प्रकरणातून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहेत. तर याबाबत संबंधित विद्युत अधिकारी किंवा पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही.

पालघरमध्ये एसटीला डंपरची धडक, एक मृत, २३ जखमी

■पालघर। प्रतिनिधी,

मनोर विक्रमगड मार्गावर भरधाव जाणाऱ्या रिकामी डंपरणे शिर्डी पालघर एसटी बसला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक लहान मुलाचा मृत्यू झाला असून २३ प्रवासी जखमी झाले असून चौघांची प्रकृती गंभीर आहे. विक्रमगड कडून मनोरकडे येणाऱ्या राज्य परिवहन मंडळाच्या बसला दुपारी एक वाजल्याच्या सुमारास मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामागार्पासून सहा किलोमीटर अंतरावर बोरांडा ग्रामपंचायत हद्दीमध्ये डम्पर धडक दिली. काही रुग्णांना डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी येथील वेदांत रुग्णालयात दाखल करण्यात आले असून एकाची प्रकृती गंभीर आहे. इतर काही रुग्णांना मनोर येथील आस्था खाजगी रुग्णालयात तर काहींना मनोर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मनोरच्या पूर्वेकडील भोपोली भागा मधून मुरूम, माती व दगड उत्खनन करून त्याचा पुरवठा राष्ट्रीय प्रकल्पांसाठी अवजड वाहनातून केला जाते. वाहतूक करणारी अवजड वाहन भरधाव वेगाने जात असतात. अशाच एका भरधाव वाहनाने धडक दिल्याने अपघात झाल्याचे समोर आले आहे.

वसई कला क्रीडा महोत्सवा दरम्यान दुर्घटना; प्रेक्षक गॅलरी कोसळून १५ जण जखमी

■वसई। प्रतिनिधी,

वसईत सुरू असलेल्या कला क्रीडा महोत्सवातील खो खो सामन्या दरम्यान प्रेक्षक गॅलरी कोसळून झालेल्या दुर्घटनेत १५ जण किरकोळ जखमी झाले. शुक्रवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. जखमी खेळाडू आणि प्रेक्षकांवर पालिकेच्या रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले. बहुतांश जखमी महिला खेळाडू होत्या. हे सर्व विरार मधील चिखल डोंगरी आणि अनार्ळा गावातील होते. वसई विरार महापालिका आणि वसई कला क्रीडा महोत्सवाच्या वतीने वसईच्या चिमाजी अप्पा मैदानावर ३४ वा कला क्रीडा महोत्सव सुरू आहे. शुक्रवारी या कला क्रीड महोत्सवाचा ४ था दिवस होता. मैदानावर विविध खेळांचे सामने रंगले होते. खो-खो सामन्याच्या वेळी उभारण्यात आलेल्या प्रेक्षक गॅलरीत दोन्ही संघांचे समर्थक मोठ्या संख्येने जमले होते. त्यामुळे साडेसातच्या सुमारास गॅलरी अचानक कोसळली. यामध्ये एकूण १५ जण जखमी झाले. त्यात खेळाडूंसह सामना बघण्यासाठी आलेल्यांचा समावेश होता. सर्व जखमींना वसई पारनाका येथील महापालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयात दाखल करण्यात आले. या सर्व जखमीना किरकोळ दुखापत झाली होती. त्यांच्यावर प्रथमोपचार करून सोडून देण्यात आले. या दुर्घटनेत कुणी गंभीर जखमी नव्हते. दोन जणांनी पोटात दुखत असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. मात्र त्यांच्या एक्सरे तपासणीत काही आढूळून आले नाही. सर्व रुग्णांना उपचार करून सोडण्यात आले, अशी माहिती सर डी.एम.पेटीट रुग्णालयाचे डॉक्टर असलम शेख यांनी दिली. वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर तसेच भाजपाचे नेते मनोज पाटील यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. खोखोचा सामना रंगतदार होता त्यामुळे उत्साहात क्षमतेपेक्षासमर्थक प्रेक्षक गॅलरीत चढले. त्यामुळे ही दुर्घटना घडली, असे माजी महापौर प्रवीण शेट्टी यांनी सांगितले. आजवर महोत्सवात अशी दुर्घटना कधी घडली नव्हती. परंतु यापुढे आम्ही आयोजनात अधिक काळजी घेऊ असेही शेट्टी यांनी सांगितले. दुर्घटनेंतर महोत्सवातील इतर सामने सुरळीत सुरू होते.

घरफोडी करणाऱ्या शिकलगार टोळी सूत्रधाराला अटक ४ गुन्हे उघडकीस

■नवी मुंबई: प्रतिनिधी,

घरफोडी करणाऱ्या एका आरोपीस वाशी पोलिसांनी अटक केली असून तो कुप्रसिद्ध शिकलगार टोळीचा असल्याचे समोर आले आहे. त्याच्या अटकेमुळे ४ गुन्ह्यांची उकल झाली असून १२ लाख ३० हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. आरोपी हे सराईत असून यापूर्वी हत्येच्या गुन्ह्यात अटक होते. या शिवाय घरफोडी, वाहन चोरी ,हत्या, हत्येचा प्रयत्न असे अनेक गुन्हे त्यांच्या नावावर आहेत. ससपाल सिंग उर्फ पापा तारासिंग कलानी असे अटक आरोपीचे नाव आहे. वाशीत राहणारे अश्विनी प्रसाद यांच्या घरातून याच टोळीने सोन्याचे व चांदीचे दागिने चोरी केले होते. याबाबत फियार्दीनी दिलेल्या तक्रारीनुसार वाशी पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा नोंद केला होता. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी एक पथक नेमले होते. त्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन नांद्रे, सत्यवान बिले पोलीस हवालदार चिकने , वारिंगे, पोलीस नाईक चंदन मस्कर, संदीप पाटील, ठाकूर पोलीस शिपाई अमित खाडे यांचा समावेश होता. या पथकाने तपास करताना गुन्ह्याच्या घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेज तपासण्यात आले व आरोपींची ओळख पटवण्यासाठी नवी मुंबई आणि ठाणे परिसरातील पोलीस ठाण्यातील अभिलेख तपासण्यात आला होता. तसेच आरोपी हे गुन्हा करतेवेळी घटनास्थळी मुखपट्टी, हातमोजे घालून आल्याने त्यांची ओळख पटवणे अत्यंत जिकरीचे होते. तसेच सदर आरोपींनी गुन्हा करताना पांढऱ्या रंगाच्या झेन गाडीचा वापर केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यात एक अडचण होती. आरोपी गुन्हा करण्यासाठी वापरलेली वाहने ही काही अंतरावर गेल्यानंतर बदलत होते. त्यामुळे माग काढणे अवघड झाले होते. मात्र अत्यंत बारकाईने घटनास्थळावरील तसेच आरोपी पळून गेलेल्या मागार्तील सुमारे ३५० ते ४०० सीसीटिव्ही फुटेजची तपासणी केली. या प्रयत्नांना यश आले आणि यातील कलानी हा कुठे राहतो त्याबाबत ठोस माहिती मिळाली. तसेच आरोपी शिकलगार म्हणून कुप्रसिद्ध टोळीचा सूत्रधार असल्याचे समोर आले. आरोपीच्या घराच्या आसपास दोन दिवस वेषांतर करून सापळा रचून अत्यंत शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपी हा हत्येच्या गुन्ह्यातून २०२२ मध्ये कारागृहातून बाहेर आला होता. याशिवाय २०१५ मध्ये वाशी पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करताना एका महिलेच्या डोक्यात लोखंडी गजाचा घाव करून तिची हत्या केली होती.

पोलिसांची मोठी कारवाई; चोरीच्या गाड्या विकणारी आंतरराज्य टोळी अटकेत

■मुंबई। प्रतिनिधी,

बनावट कागदपत्रे तयार करून चोरीच्या महागड्या चारचाकी विकणाऱ्या आंतरराज्य टोळीला मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने गजाआड केली आहे. त्यांच्याकडून तब्बल दोन कोटी ४८ लाख रुपये किमतीची आठ वाहने जप्त करण्यात आली आहेत. याप्रकरणी सहा आरोपींना अटक केली असून आणखी काही आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत. फियार्दी हर्ष दोशी यांना आरोपींनी अशाच प्रकारे एक महागडी गाडी विकली होती. ही गाडी शोरूममध्ये सर्व्हिसिंगसाठी दिली असता त्यांना ही गाडी दुसऱ्याच व्यक्तीच्या नाववर असल्याचे समजले. दोशी यांनी या प्रकरणी मिरा रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या गुन्ह्याचा मध्यवर्ती गुन्हे शाखेचे निरीक्षक राहुल राख, उपनिरीक्षक हितेंद्र विचारे यांनी तपास सुरू केला. गाडीच्या मूळ मालकाचा शोध घेतला असता त्याने त्याची गाडी दिल्लीमधून चोरी झाली असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील तपासात दिल्लीमध्ये अशाच प्रकारे वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात चोरीचे आठ गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर शिताफीने तपास करत पोलिसांनी मिलनराजसिंह ऊर्फ बापू सुरेशकुमार चौहान, तारीफहुसेन इक्बाल खान, ईर्शाद अकबरभाई अजमेरी, वसीम अल्ताफ पठाण, शाहीद आयुब खान व नबीजान ऊर्फ अल्लाबक्ष शौकतअली अन्सारी या सहा आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून २ कोटी ४८ लाख रुपये किमतीच्या आठ महागड्या गाड्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

जैवविविधतेने नटलेले चौल-रेवदंडा

■ रेवदंडा। प्रतिनिधी,

अलिबाग तालुक्यातील दक्षिण टोकाला असलेल्या चौल व रेवदंडा ही गावांना ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे, त्याचप्रमाणे ही गावे जैवविविधतेने नटल्याने थर्टी फर्स्टसाठी पर्यटकांचा ओघ वाढला आहे. या गावांमध्ये काय पिकते आणि काय विकते याचा प्रत्यय गावांच्या नाक्यावर फेरफटका मारल्यावर येतो. ताजा भाजीपाला, फळे, फुले, दवणा-मरवा, पाचू, गुलाब, बकुळ, कवटी चाफा, सोनटक्का ही स्थानिक फुले पर्यटकांना मोहिती घातलात. फुलांचा मंद सुगंध वातावरणात वेगळाच उत्साह निर्माण करतो. याशिवाय पांढरी, जांभळी, कोरांटीची फुले अनेकांच्या दारांत फुललेली दिसतात. नारळ-सुपारी ही नगदी पिके नोव्हेंबरपासून दोन-तीन महिने येते. पिवळ्या केशरी रंगाच्या सुपारीचा पाडा झाला की ही फळे टोपलीत गोळा करून अंगणात याचा ढीग रचला जातो. या सुपारीच्या ताज्या फळांचा मंद सुगंध खूप आल्हाददायक असतो. नारळांच्या पाड्यालाही सुगंध असतो. त्यामुळे संपूर्ण गावात अत्तरांच्या कूपींप्रमाणे मंद सुवास दरवळत असतो. ऐतिहासिक बंदर असलेल्या चौलची स्वच्छ हवा, वेगवेगळ्या फुलांचा सुगंध गावाविषयी बरेच काही सांगून जातो. भात आपण रोजच खातो, मात्र जेव्हा शिवारात भाताचे पीक डोलू लागते, तेव्हा मन प्रसन्न-तृप्त होते. वाऱ्यावर डोलणारी शेती पहिली की, हिरवे हिरवे गार गालिचे, हरिततृणांच्या मखमालीचे या बालकवींच्या कवितेतील ओळ ओठांवर आल्याशिवाय राहत नाही.

आम्रवृक्षावरील फुललेला मोहोराचा सुगंधही तसा दुर्मिळच. जांभळा, कांचन, कातर जास्वंद, सीतेचा अशोक अशा देशी-विदेशी वृक्षांबरोबर मेक्सिकोचा अव्हेकॅडो, अमेरिकन पॅशनफ्रुट येथील वाड्यांमधून आंतरपीक म्हणून घेतली जात आहेत. मसाला पिकातील जायफळ, मिरी, दालचिनी येथे पाहायला मिळतात. त्याप्रमाणे विविध प्रजातींचे पशु-पक्ष्यांचे वास्तव्यही याठिकाणी आढळते. खंड्या, हातभार, कोकीळ, हार्नबिल, भारद्वाज, स्वर्गीय नर्तक, गरुड, रानबर्ड, सुगरण शिंपी, तांबट, टिटवी, पावशा आदी पक्ष्यांचा किलबिलाटाने परिसरात नवचैतन्याचा भास होतो. नववर्षाच्या स्वागतासाठी सध्या परिसरात पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले असून ताज्या मासळी खवय्यांकडून ताव मारण्यात येत आहे.

रायगड जिल्हा निसर्ग सौंदयार्ने नटलेला आहे. येथील जैविक-भौगोलिक बाबींचा विचार करून समुद्रकिनाऱ्याचे सुशोभकरण, बांधबंदिस्ती, पशु-पक्ष्यांचे अधिवासाचे संरक्षण-संवर्धन आवश्यक आहे. येथील जैवविविधतेची भावी पिढ्यांसाठी अनमोल ठेवा आहे. जिल्ह्यातील गडकिल्ले, समुद्रकिनारे तसेच धार्मिक स्थळांबरोबरच जैवविविधतेने नटलेले निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी शैक्षणिक सहली दाखल होत आहेत. विद्यार्थीही या सहलींचा मनमुराद आनंद घेत आहेत. नुकतीच माणगाव तालुक्यातील पाटणूस परिसरात सोलापूर येथील शाळेची सहल आली होती. निसर्ग अभ्यासक शिक्षक राम मुंडे काही दिवसांपूर्वी सोलापूर-बाशीर्तील महात्मा फुले शाळेत पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम घेतला होता. यावेळी विद्यार्थी तसेच शिक्षकांनी रायगड जिल्ह्यातील निसर्गसौंदर्य, अभयारण्य, वनराई पाहण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार शाळेचे मुख्याध्यापक गणेश गोटे यांनी निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. मुंडे यांनी, माणगावातील निसर्ग, वनराई, पशु-पक्षी, गिधाडांची घरटी आदींची माहिती दिली.

ठाण्यातील मोह विद्यालय महाराष्ट्रातील पहिली हरित शाळा, माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पाची उभारणी

■ठाणे। प्रतिनिधी,

पर्यावरणीय संसाधनाचा वापर आणि त्यातून शिक्षण प्रवाह सुरू ठेवण्याच्या उद्देशाने ठाण्यातील मोह विद्यालय आणि रमेश परमार कनिष्ठ महाविद्यालयात सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प आणि जनजागृती केंद्र उभारण्यात आले आहे. शाळेच्या शतकोत्तरी सोहळ्याच्या निमित्त माजी विद्यार्थ्यांच्या आर्थिक मदतीतून सौर उर्जा प्रकल्प आणि जनजागृती केंद्र उभारण्यात आले आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन समाजसेविका मेधाताई पाटकर यांच्या हस्ते होणार आहे. ठाण्यातील मोह विद्यालय ही १३२ वर्ष जुनी शाळा आहे. या शाळेचा वर्षभरातील आर्थिक खर्चामध्ये एक लाखाहून अधिक खर्च हा वीज वापरासाठी होत होता. दैनंदिन कामासाठी विद्यालयात वापरली जाणारी वीज आणि त्यातून येणारा आर्थिक खर्च कमी व्हावा याकरिता विद्यालयात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करून सौरऊर्जा प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे. शाळेचे माजी मुख्याध्यापक स. वि. कुलकर्णी यांच्या नावे सौरऊर्जा निर्मिती आणि जनजागृती केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या प्रकल्पाची संकल्पना शाळेच्या शतकोत्तरी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात नावारूपास आली. माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाकरिता माजी विद्यार्थी संजय मंगला गोपाळ आणि लतिका सुप्रभा मोतीराम या दाम्पत्यांनी विद्यालयास आर्थिक मदत केली आहे.

अब्जाधीश उद्योगपतीचा मुंबई लोकलमधून प्रवास

■मुंबई। प्रतिनिधी,

कर्जत-कसारा, वसई-विरार आणि पनवेलपर्यंत पोहोचलेल्या मुंबई लोकलची भुरळ प्रत्येकाला पडते. मुंबईतील रस्ते वाहतूक वेळखाऊ असते. त्यामुळे मुंबई लोकल सर्वांसाठी फायदेशीर ठरते. कमी वेळेत मुंबईत पोहोचायचं असेल किंवा मुंबईतून कर्जत-कसारा, वसई-विरार किंवा पनवेलला जायचं असेल तर अनेकजण मुंबई लोकलचा वापर करतात. आता चक्क एका अब्जाधिश उद्योगपतीने कमी वेळात उल्हासनगरला पोहोचण्यासाठी त्यांनी मुंबई लोकलचा वापर केल्याचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रात अग्रणी नाव असलेले प्रसिद्ध अब्जाधिश उद्योगपती निरंजन हिरानंदानी यांनी मुंबई ते उल्हासनगर असा मुंबई लोकलने प्रवास केला. मुंबईच्या एसी लोकलने त्यांनी उल्हासनगर गाठलं. वेळ वाचवाणारं आणि मुंबईतील वाहतूक कोंडीविरोधात सामना करणाऱ्या मुंबईच्या एसी लोकलने मुंबई ते उल्हासनगर असा प्रवास केला. हा प्रवास अभ्यासपूर्ण होता, अशी पोस्ट व्हीडिओसहित निरंजन हिरानंदानी यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ते इतर प्रवाशांशी गप्पा मारतानाही दिसत आहेत.

हा व्हीडिओ २४ तासांआधीच हिरानंदानी यांनी शेअर केला आहे. २४ तासांत या व्हिडीओला २१ मिलिअन्सहून अधिक व्ह्युज मिळाले आहेत. दरम्यान, हिरानंदानी चुकून अपंग कोचमध्ये चढले असल्याची प्रतिक्रिया काही नेटिझन्सने दिली आहे. तर, अनेकांनी हिरानंदानी यांचं कौतुक केलं आहे. तसंच, अनेक उद्योगपतींनी सार्वजनिक वाहतूक वापरली तर सरकार लोकांना चांगल्या सेवा देण्यासाठी प्रोत्साहित होईल, असंही एकाने म्हटलं आहे.

दरम्यान, मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या अनेक प्रतिष्ठित लोकांकडूनही मुंबई लोकलचा वापर केला जातो. मुंबईच्या रस्ते वाहतूक कोंडीत अडकून पडण्यापेक्षा त्यांना मुंबईची लोकल आपलीशी वाटते. त्यातच, रेल्वे मंत्रालयाने मुंबईतील मध्य आणि पश्चिम मार्गावर एसी लोकल सुरू केल्याने अनेक प्रतिष्ठित लोक या एसी लोकलमधून प्रवास करतात. परिणामी रस्ते वाहतूक कमी होते. निरंजन हिरानंदानी यांच्यासारख्या अनेकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर केल्यास आगामी काळात वाहतूक कोंडी कमी होऊन सार्वजिक वाहतूक व्यवस्था सुधारली जाऊ शकेल.

मुंबईबाहेरून येणारे अनेक लोकप्रतिनिधीही अनेकदा मुंबई लोकलचा वापर करतात. काही महिन्यांपूर्वी विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनीही खड्डे आणि वाहतूक कोंडीला वैतागून मुंबई लोकलची वाट धरली होती.

आंबेगाव कारवाई! इमारत पाडली, अन आयुष्यभराची कमाई गेली

■पुणे । प्रतिनिधी,

तुटलेल्या खिडक्या, दारे... फुटलेल्या काचा... विटा, सिमेंटचा पडलेला राडारोडा... भग्न झालेल्या इमारतींमध्ये आपले घर कसे आहे असे याचा शोध घेणारे नागरिक. संपूर्ण आयुष्याची पुंजी बिल्डरला देऊन टाकून घर घेतले. पण ही इमारत अनधिकृत असल्याने महापालिकेने बुलडोझर चढविल्याने अतिशय संतप्त पण हताशपणे या पडक्या इमारतींकडे पाहात होते. ही अवस्था होती एका सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची. महापालिकेने आंबेगाव बुद्रूक येथे सर्वे क्रमांक ४४ मधील ११ अनधिकृत इमारतींवर कारवाई केली. २०२१ मध्ये या बांधकामाला नोटीस बजावली होती, पण कारवाई केली नव्हती. पण गेल्या दोन वर्षात अनेक नागरिकांनी घरे घेतली, त्यानंतर महापालिकेने येथे कारवाई केली. ज्यांनी येथे सदनिका विकत घेतल्या आहेत, त्यांना कारवाईची माहिती मिळताच या ठिकाणी धाव घेतली. बिल्डर फोन घेत नव्हता, बांधकामाच्या ठिकाणी माहिती देण्यासाठी कोणीच नव्हते. त्यामुळे सदनिकाधारकांची अस्वस्थता वाढत होती. पण बिल्डरच्या विरोधात बोललो तर पुन्हा तो पैसे परत करण्यासाठी सहकार्य करायचा नाही यामुळे नाव न छापण्याच्या अटीवर ते बोलण्यास तयार झाले. एका खासगी संस्थेतून शिपाईपदावरून सेवानिवृत्त झालेले ज्येष्ठ नागरिक म्हणाले, ह्यसेवानिवृत्त झाल्याने माज्याकडे पैसे जमा झाल्याने गेल्यावर्षी या ठिकाणी घर घेतले. त्यावेळी बांधकाम व्यावसायिकाने ही घरे अधिकृत होतील असे आश्वासन दिले. बाजारभावापेक्षा खूप कमी म्हणजे १८ लाख रुपयात वन बिएचके मिळत असल्याने घर घेतले. त्याला रोख रक्कम दिली. पण इथे महापालिकेने कारवाई केल्याचे कळताच बिल्डरला फोन केला पण तो आता फोनच उचलत नाही. माझी आयुष्यभराची कमाई बरबाद झाली.

जळगाव जिल्ह्यात ताडीची अवैध वाहतूक, वाहनासह पाच लाख २० हजारांचा मुद्देमाल ताब्यात

■जळगाव। प्रतिनिधी,

जळगाव जिल्ह्यात पाचोरा उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईत एका वाहनातून ४०० लिटरची ताडी जप्त करण्यात आली. वाहनासह पाच लाख २० हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्याच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हाभरात राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे अवैध दारू विक्री, निर्मिती व वाहतूक करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम राबविली जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. विजय भुकन यांच्या नेतृत्वात २२ डिसेंबरपासून जळगाव जिल्ह्यात दारूबंदी विभागाच्या सहकार्याने अवैध दारू विक्री, निर्मिती व वाहतूक करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम सुरू आहे. पाचोरा विभागाचे दुय्यम निरीक्षक विलास पाटील, पोलीस कर्मचारी गिरीश पाटील यांनी शनिवारी जामनेर- बोदवड रस्त्यावर संशयास्पद वाटणारी भरधाव मोटार पकडली. मोटारीत ४०० लिटर तयार ताडी मिळून आली. संशयित मोहंमद अजीद यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जळगाव जिल्ह्यात ढाब्यांसह हातगाड्यांवर कारवाई

जळगाव जिल्ह्यात ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांसह बनावट दारूचा शिरकाव होण्याची शक्यता असल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी सहा-सात दिवसांत अवैधरित्या दारू विक्री करणाया ३५ पेक्षा अधिक ढाब्यांसह हातगाड्यांवरही कारवाई करीत मद्यसाठा जप्त केला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एक लाखावर मद्यप्राशनासाठी लागणारे परवाने देण्यात आले असून, देशीसाठी दोन रुपये, तर विदेशी मद्यासाठी पाच रुपये शुल्क आहे. एका दिवसाच्या परवान्यासाठीही राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज आले. कायद्याच्या चौकटीत राहूनच सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करा, यादृष्टीने प्रशासन सज्ज आहे. कुठलाही गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असा इशारा अधीक्षक डॉ. विजय भुकन यांनी दिला आहे.

नववर्षाच्या पहिल्या दिवशी श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरात गर्दीची शक्यता; वाहतुकीत असे होणार बदल



■पुणे प्रतिनिधी,

नववर्षाच्या पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने सोमवारी (१ जानेवारी) मध्यभागातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात येणार आहेत. शिवाजी रस्ता वाहनांसाठी बंद करण्यात येणार आहे.

शिवाजी रस्त्यावरुन स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी जंगली महाराज रस्ता, डेक्कन जिमखाना खंडोजीबाबा चौकमार्गे टिळक रस्त्याने स्वारगेटकडे जावे. जंगली महाराज रस्त्यावरील स. गो. बर्वे चौकातून (मॉडर्न कॅफे चौक) महापालिका भवनकडे जाणारा मार्ग वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी जंगली महाराज रस्ता, झाशीची राणी चौक, महापालिका भवनमार्गे इच्छितस्थळी जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे. अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे (हुतात्मा चौक) जाणारा मार्ग बंद करण्यात येणार आहे. वाहनचालकांनी बाजीराव रस्त्याने इच्छितस्थळी जावे. शिवाजी रस्त्यावरील जिजामाता चौकातून गणेश रस्त्यावरुन दारुवाला पूलकडे जाण्यास मनाई करण्यात आली आहे. वाहनचालकांनी गाडगीळ पुतळामार्गे, कुंभारवेस चौक, पवळे चौक, साततोटी चौकमार्गे इच्छितस्थळी जावे. गणेश रस्त्याने जिजामाता चौकाकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे

नायलॉन मांजा विक्रेत्यावर कारवाईची 'संक्रांत', तब्बल पाच लाखांचा मांजा जप्त

■यवतमाळ। प्रतिनिधी,

मकरसंक्रांतीनिमित्त सर्वत्र पतंगोत्सव सुरू झाला आहे. मात्र त्यासाठी बंदी असलेला नायलॉन मांजाची विक्री सुरूच आहे. त्यामुळे मानवांसह पक्षांचाही जीव धोक्यात येत असल्याने पोलिसांनी बंदी असलेल्या नायलॉन मांजा विक्रीवर टांच आणली आहे. येथील मारवाडी चौकात मांजा विक्री करणाऱ्या दुकानात छापा टाकून साडेपाच लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. बंटी नंदकिशोर सिवोटीया (रा. मारवाडी चौक, यवतमाळ) असे गुन्हा नोंद झालेल्या विक्रेत्याचे नाव आहे. अवैध नायलॉन मांजाच्या वापरामुळे दरवर्षी जीवितहानी होत आहे. तसेच मोठ्या प्रमाणात अपघात घडतात.

तळवडे दुर्घटनेतील मृतांच्या वारसांचा टाहो; घरातली कमावती माणसे गेली, सरकार मदत देणार कधी?

■पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी,

तळवडे येथील केकवर लावायच्या शोभेच्या फटाक्याच्या (स्पार्कल कँडल) मेणबत्ती कंपनीतील स्फोटात मृत्यू झालेल्या १४ महिला कामगारांच्या नातेवाइकांना मदतीची प्रतीक्षा आहे. या घटनेला २१ दिवस होऊनही मृतांच्या नातेवाइकांना शासनाने जाहीर केलेली पाच लाखांची मदत अद्याप मिळालेली नाही. तळवडे येथील रेडझोन हद्दीत बेकायदा सुरू असलेल्या मेणबत्ती कंपनीत आठ डिसेंबर रोजी स्फोट होऊन आग लागली. या आगीत सहा महिला कामगारांचा जागीच होरपळून मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले होते. यामधील आठ महिलांचा उपचारादरम्यान ससून रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेत एकूण १४ महिला कामगारांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्य सरकारच्या वतीने मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत जाहीर केली. मात्र, २१ दिवस होऊनही राज्य सरकारने जाहीर केलेली मदत अद्याप मृतांच्या वारसांना मिळालेली नाही. त्यामुळे सरकारने जाहीर केलेली मदत तरी लवकर मिळावी, अशी मागणी नातेवाइकांमधून केली जात आहे. दरम्यान, कारखाना मालकाने अग्निशामक दलासह कोणतीच परवानगी घेतली नव्हती. त्यामुळे या घटनेला कारखाना मालकासह महापालिका प्रशासनही तितकेच जबाबदार असल्याचा आरोप असताना मृतांच्या वारसांना महापालिकेने मदत केलेली नाही.

'ससून'मधील घोळ संपेना! सहा महिन्यांत चौथा अधीक्षक नेमण्याची वेळ

■पुणे। प्रतिनिधी,

ससून सर्वोपचार रुग्णालयात सध्या वैद्यकीय अधीक्षक पदाची संगीत खुर्ची सुरू आहे. विद्यमान अधीक्षक डॉ.किरणकुमार जाधव यांना हटवून आता त्यांच्या जागी डॉ.अजय तावरे यांची तडकाफडकी नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे सहा महिन्यांत चौथा अधीक्षक नेमण्याचा विक्रम रुग्णालय प्रशासनाने केला. विशेष म्हणजे अधिष्ठातापदाचा कार्यभार डॉ.विनायक काळे यांनी स्वीकारल्यानंतर महिनाभरातच त्यांनी अधीक्षक बदलण्याचे पाऊल उचलले आहे. ससूनच्या वैद्यकीय अध्यक्षपदी मे महिन्यात डॉ. यल्लपा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ऑगस्टमध्ये त्यांना हटवून डॉ. सुनील भामरे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर डॉ. भामरे यांच्याजागी सप्टेंबरमध्ये प्रमुख डॉ.किरणकुमार जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. जाधव यांनी रुग्णालयाच्या प्रशासनातील गोंधळ दूर करीत सुसूत्रता आणली होती. याचबरोबर त्यांनी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांसाठी वक्तशीरपणा आणि शिस्तीचे पाऊल उचलले होते. याबद्दलही अनेक जण त्यांच्यावर नाराज होते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

नववर्ष स्वागत समारंभांना करोनाची धास्ती; वाढत्या रुग्णसंख्येमुळे गर्दी टाळण्याचा डॉक्टरांचा सल्ला

■मुंबई। प्रतिनिधी,

नववर्षाच्या स्वागतासाठी सर्वत्र जोरदार तयारी सुरू आहे. मात्र, मागील आठवडाभरापासून राज्यात वाढत असलेल्या करोना रुग्णांच्या संख्येमुळे आणि राज्य सरकारकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत असल्यामुळे नववर्षासाठी आयोजित करण्यात येत असलेल्या समारंभांमध्ये सहभागी होण्याची नागरिकांना धास्ती वाटू लागली आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी मुंबईसह आसपासच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणात जंगी पार्टयांचे आयोजन करण्यात आले आहे. पंचतारांकित हॉटेल, रिसॉर्ट, मॉल, कंपन्या, पब येथे स्वागत समारंभांची तयारी सुरू आहे. समारंभांमध्ये सहभागी होण्यासाठी मोठया प्रमाणावर नोंदणीही करण्यात आली आहे. मात्र, आता पुन्हा एकदा करोना बाधितांची संख्या वाढू लागल्यामुळे नागरिक धास्तावले आहेत. त्यामुळे पार्टयांमध्ये सहभागी व्हावे की, नाही याबाबत नागरिकांकडून डॉक्टरांकडे विचारणा होत आहे. डॉक्टरही गर्दी, पार्टी टाळण्याचा, मुखपट्टी वापरण्याचा सल्ला देत आहेत. सध्या देशात सापडणाऱ्या १०० रुग्णांमध्ये साधारणपणे सात ते आठ रुग्णांचा मृत्यू होत आहे. त्यामुळे सध्या पार्टीला जाण्याचे टाळावे. जाणे आवश्यकच असेल तर मुखपट्टी वापरावी. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, असे इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन, मुंबई शाखेचे सचिव डॉ. भरत जगियासी यांनी सांगितले. पंचतारांकित हॉटेल, रिसॉर्ट, मॉल, पबकडून आयोजित पार्टयांसाठी ऑनलाइन नोंदणी करण्यात येत आहे. ही नोंदणी करताना आयोजकांकडून नागरिकांना मुखपट्टीचा वापर, सामाजिक अंतर राखणे अशा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याबाबत सूचना संकेतस्थळावरून देण्यात आल्या आहेत. वाढत्या रुग्णसंख्येमुळे घाबरण्याची गरज नसली तरी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. समारंभांमध्ये सहभागी होताना मुखपट्टी वापरणे आवश्यक आहे.

शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन कार्यान्वित

■मुंबई। प्रतिनिधी,

शीव येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक सर्वोपचार रुग्णालयात प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन कार्यान्वित करण्यात आले आहे. वापरलेली पाण्याची रिकामी बाटली या यंत्रामध्ये टाकताच तिचा अक्षरशः चिमूटभर भुगा होणार आहे. त्यामुळे एकंदरीत कचऱ्यामधली बाटल्यांची संख्या कमी झाल्याने त्या कचऱ्याचे विलगीकरण व व्यवस्थापन करणे अधिक सुलभ होणार आहे. प्लास्टिकच्या बाटल्यांचा मशीनद्वारे करण्यात आलेल्या भुग्याचा पुनर्चक्रीकरणासाठी वापर होणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये येणारे रुग्ण आणि त्यांची आप्त मंडळी ही पिण्याच्या पाण्यासाठी अनेकदा पॅक बंद असणाऱ्या व सहजपणे उपलब्ध असणाऱ्या प्लास्टिक बाटल्यांचा वापर करतात. बाटलीतले पाणी संपल्यानंतर त्या बाटल्या कचऱ्यात जातात. मात्र या बाटल्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आकारांमुळे कचराकुंडीतली खूप जागा या बाटल्यांनी व्यापलेली असते. तसेच यामुळे कचऱ्याचे विलगीकरण करणेही तुलनेने कठीण होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन रुग्णालयात प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन कार्यान्वित करण्याचे आदेश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार लोकमान्य टिळक रुग्णालयात नुकतेच प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन कार्यान्वित करण्यात आले असल्याची माहिती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहन जोशी यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहिती देताना डॉ. जोशी यांनी सांगितले की, रुग्णालयात ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अनेकदा रुग्ण व त्यांचे आप्त बाटलीबंद पाणी पिण्यास प्राधान्य देतात. यामुळे रुग्णालयातील एकंदरीत कचऱ्यात या प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्यांचे प्रमाण लक्षणीय असते. रुग्णालयातील सफाई कर्मचाऱ्यांद्वारे रोज गोळा करण्यात येणाऱ्या कचऱ्यामधील प्लास्टिक बाटल्या आता वेगळ्या करण्यात येत असून त्यात पिण्याच्या पाण्यासह शीतपेयांसारख्या अन्य प्लास्टिक बाटल्यांचाही समावेश समावेश आहे.

...अन ती कोयता गँगला भिडली; पोलीस हवालदार सीमा वळवी यांच्या प्रसंगावधानमुळे अनर्थ टळला

■पुणे। प्रतिनिधी,

रात्री अकराच्या सुमारास चंदननगर पोलीस ठाण्यातील हवालदार सीमा वळवी कामावरुन घरी निघाल्या होत्या. तेवढ्यात कोयते उगारुन दहशत माजविणाऱ्या टोळक्याला वळवी यांनी पाहिले. नागरिकांची गर्दी झाली होती. सर्वजण बघ्याच्या भूमिकेत होते. गुंडांनी कोयते उगारल्याने नागरिक भयभीत झाले होते. वळवी यांनी क्षणाचा विचार न करता दुचाकी रस्त्याच्या कडेला लावली. तरुणावर कोयत्याने वार करणाऱ्या एका गुंडाला त्यांनी पकडून ठेवले. वळवी यांनी आरडाओरडा केल्याने गुंडाबरोबर असलेल्या साथीदारांनी पळ काढला. वळवी यांनी त्वरित या घटनेची माहिची चंदननगर पोलीस ठाण्यात दिली. या घटनेनंतर पसार झालेल्या गुंडांना पोलिसांनी पाठलाग करुन २० मिनिटांत पकडले. वडगाव शेरी भागात रविवारी (२४ डिसेंबर) रात्री वैमनस्यातून तीन जणांवर कोयत्याने वार करण्यात आले. भररस्त्यात कोयते उगारुन आरोपींनी दहशत माजविली. याप्रकरणी पोलिसांनी सराइतांना अटक केली. गुंड तीन तरुणांना मारहाण करत होते. त्यांच्यावर कोयत्याने वार करुन दगड फेकून मारण्यात आले. पोलीस गणवेशात असलेल्या वळवी यांनी प्रसंगावधान राखले. पोलीस गणवेशतील वळवे यांना पाहून गुंडांनी तेथून पळ काढला. पळणाऱ्या एका गुंडाला वळवी यांनी पकडले.

'ज्यांनी एक सार्वजनिक निवडणूक लढवली नाही, त्यांच्या आव्हानाला मी भीक घालत नाही' बारणेंचे संजय राऊतांना प्रत्युत्तर

■पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी,

आगामी लोकसभा निवडणुकीवरून महाराष्ट्रात सर्वच नेते ॲक्टिव्ह झालेत. पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनी शिवबंधन बांधल्याने आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना हरवायचं आहे. आपला मतदारसंघ परत खेचून आणायचा, असे म्हणत संजोग वाघेरे यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. यावर विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रत्युत्तर दिल असून ज्या व्यक्तीने एकही सार्वजनिक निवडणूक लढवली नाही. अशा व्यक्तींकडे दुर्लक्ष करायचं. कुणी काही बोललं म्हणजे उमेदवार विजयी होत नसतो, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लगावला आहे. बारणे पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघातील कामाच्या जोरावर मी निवडणूक लढवणार आहे. मतदारच कोणाला निवडून द्यायचे हे ठरवत असतो. मावळची जनता विकासाला मत देतील, असा विश्वास व्यक्त केला. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी मलाच उमेदवारी द्यायची असं ठरवलं. माज्यापेक्षा नेतेच तुम्हाला या संदर्भात सांगतील. संजोग वाघेरे यांच्याबद्दल बोलणे योग्य ठरणार नाही. मी कुठल्याही विरोधी पक्षाच्या उमेदवारावर व्यक्तिगत बोलत नाही. २०२४ चा निकाल लागेल तेव्हा तुम्हाला कळेल की श्रीरंग बारणे यांची हॅट्रिक झाली, असे बारणे म्हणाले. ऐनवेळी पार्थ पवारला उमेदवारी दिली जाऊ शकते, या प्रश्नावर बोलताना बारणे म्हणाले, भाजपाच्या केंद्रीय आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी मावळ लोकसभेसंदर्भात निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे त्या संदर्भात मी बोलणं योग्य ठरणार नाही. पार्थ पवार यांच्यावर बोलणं बारणे यांनी टाळलं.

सहकार समृद्धीसाठी नवे धोरण; केंद्राप्रमाणे राज्याच्या कायद्यात बदल, तज्ञ समितीची स्थापना

■मुंबई। प्रतिनिधी,

सहकारातून समृद्धी साधण्यासाठीचे नवे धोरण तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार केंद्राच्या सहकार धोरणाच्या धर्तीवर राज्याचे नवे सहकार धोरण तयार करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीच्या अहवालानुसार सहकार कायद्यात येत्या अधिवेशनात सुधारणा करण्यात येणार असल्याची माहिती सहकार विभागातील सूत्रांनी दिली. आजवर महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात अशा काही ठरावीत राज्यांपर्यंत मर्यादित राहिलेली सहकार चळवळ देशभरात रुजविण्याठी आणि सहकारातून समृद्धी ही संकल्पना साध्य करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्रपणे सहकार खाते निर्माण केले आहे. तसेच देशासाठी सहकार धोरण ठरविण्यासाठी माजी मंत्री सुरेश प्रभू यांच्या समितीने आपला अहवाल काही दिवसांपूर्वीच केंद्राला सादर केला आहे. केंद्राच्या अहवालाच्या आधारे केंद्र सरकार लवकरच नवे राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करणार आहे. त्यानुसार या अहवालातील शिफारशींच्या आधारे राज्याच्या सहकार धोरणात बदल करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली या क्षेत्रातील तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांचे ऑल आऊट ऑपरेशन; २३ फरार आणि वॉन्टेड आरोपींना पोलिसांकडून अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येच्या जल्लोषात विघ्न येऊ नये यासाठी मुंबई पोलिसांनी शहरात शुक्रवारी रात्री उशिरा ऑल आऊट ऑपरेशन मोहीम राबवली. या कारवाईत पोलिसांनी २३ फरार आणि वॉन्टेड आरोपींना अटक केले. २१७ ठिकाणी कोंबिग ऑपरेशन करण्यात आले तर ७९६४ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या १८०७ जणांवर, तर १३५५ चालकांवर मोटर वाहन कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात आली. यावेळी ६३ मद्यपी चालकांवरही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. सरत्या वर्षाला निरोप देताना तसेच नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी एकीकडे मुंबईकर सज्ज झाले असताना मुंबई पोलिसांनी शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. शहरात कोणताही अनुचीत प्रकार घडू नये, म्हणून मुंबई पोलिसांनी शुक्रवारी रात्री अकरा वाजता अचानक ऑल आऊट ऑपरेशन मोहीम सुरु केली. रात्री तीन वाजेपर्यंत ते ऑपरेशन सुरू होते. त्यावेळी पाच प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, तेरा पोलीस उपायुक्त, ४१ सहाय्यक पोलीस आयुक्त आणि ९३ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचायांनी आपल्या हद्दीत विशेष मोहीम हाती घेतली होती. पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी पोलीस ठाणे, नाकाबंदी आणि कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान विविध ठिकाणी भेट देऊन पोलिसांना मार्गदर्शन केले. या कारवाईदरम्यान अभिलेखावरील वॉन्टेड व फरार असलेले एकूण ८८७ आरोपी तपासण्यात आले, त्यात २३ आरोपी विविध गुन्ह्यांत फरार आणि विविध गुन्ह्यांत आरोपी असलेल्यांना अटक करण्यात आली. अजामिनपात्र वॉरंट बजावून ७७ जणांना तसेच एनडीपीएस कलमांतर्गत १०४ जणांना अटक करण्यात आली. महिलांविरोधातील गुन्हे, तसेच गंभीर गुन्ह्यांतील ३१ आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. सराईत चोरांच्या टोळीविरोधात दोन कारवाया करण्यात आल्या. अवैध शस्त्रे बाळगल्याप्रकरणी ४९ जणांवर कारवाई करुन त्यांच्याकडील शस्त्रे जप्त करण्यात आले. सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत २१७ ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन करवण्यात आले.

नाशिकमध्ये गुंडा विरोधी पथकाचा टवाळखोरांना दणका; महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई

■नाशिक। प्रतिनिधी,

शहरातील शाळा, महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्या टवाळखोरांना शहर पोलिसांच्या गुंडाविरोधी पथकाने दणका दिला असून ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली.

नाशिककरांनी पोलिसांच्या या कारवाईचे स्वागत केले असून अशी कारवाई नियमितपणे करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुंडाविरोधी पथकास शहरातील गुन्हेगारी टोळ्या, नोंदीतील गुन्हेगार यांचे समूळ उच्चाटन करण्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत. परंतु, त्यासह शाळा आणि महाविद्यालयांबाहेर, परिसरात विनाकारण फिरणारे, महाविद्यालयांमधील मुलांना वाईट मागार्ला लावणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिले. त्यानुसार ३१ डिसेंबरच्या अनुषंगाने शनिवारी पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी गुंडाविरोधी पथकास सूचना केल्या. त्यानुसार गुंडाविरोधी पथकाचे प्रभारी निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते आणि पथकाने नाशिक शहरातील महाविद्यालय परिसरात गस्त करून टवाळखोरांना ताब्यात घेऊन सरकारवाडा पोलीस ठाणे, गंगापूर पोलीस ठाण्यात कारवाई केली. गुंडाविरोधी पथक महाविद्यालय परिसरात दाखल होताच विनाकारण फिरणाऱ्या टवाळखोरांची चांगलीच धावपळ उडाली. त्यांनी महाविद्यालय परिसरातून धूम ठोकली.